पन्नास पैसे

शनिवार
२१ ऑक्टोबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : एकवीस

## सप्रेम नमस्कार....

२८ सप्टेंबर, ७२

□ श्री. देवीदास वागूल यांनी संस्कार, प्रतिद्वंद्वी, रॉयन्स डॉटर वगैरे चित्रपटासंबंधी 'माणूस' मधून जे लिहिले ते वेगळेपणामुळे लक्षात राहील. चित्रपट इन्ट्रोडच्यूस करण्याची ही पद्धती मराठीत तरी अनोखी आहे. चित्रपट प्रेक्षकासमोर जसजसा उलगडत जातो तसतशा जाणत्या प्रेक्षकाच्या मनात तयार होत राहणाऱ्या प्रतिक्रिया ते टिपतात. बहुधा वागूल दिग्दर्शकाच्या नजरेने चित्रपट बघत व सांगत असावे. चित्रपटाची कथा सरधोपट पद्धतीने सांगणेही त्यांनी नाकारले आहे. त्यामुळे वागूलांचा मजकूर वाचताना एक वेगळी लघुकथाही वाचल्याचा आनंद मिळतो.

—ह. मो. मराठे, पुणे.

२९ सप्टेंबर, ७२

□ 'माणूस'च्या २३।९।७२ च्या अंकात 'आलेपाक'कार अनंतराव म्हणतात —कुत्र्या-माणसात काय मोठा फरक आहे? माणसे काय भुंकत नाहीत? माणसे काय खाऊ घालणाऱ्या धन्याच्यापुढे घोटाळत नाहीत इ. इ.— परंतु कुत्र्या-माणसातील फरक पूर्वी कोठेतरी वाचलेला स्मरतो. तो फार मार्मिक वाटतो. तुम्ही एखाद्या कुत्र्याला भाकरीचा तुकडा द्या; तो तुमच्या अंगावर भुंकणार नाही. कुत्रा व माणूस यात हाच फरक आहे. सहज ओघात



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आठवले म्हणून लिहिले.

**माधव जठार**, भायखळा (मुंबई)

**२९ सप्टेंबर, १९७२**

■ 'माणूस 'च्या २३ सप्टेंबरच्या अंकातील डॉ. बाबा आढाव यांचा 'सत्यनारायण पूजा : बंदी हवी' हा लेख वाचून अत्यानंद झाला. अत्यानंद अशासाठी की सत्यनारायण पूजेच्या संदर्भात माझ्या मनात हेच विचार बऱ्याच वर्षांपासून घोळत होते. लोक टीका करतील म्हणून मी माझे विचार प्रकट करू शकत नव्हतो. डॉ. आढावांनी मात्र न भिता आपले विचार प्रकट केले म्हणून त्यांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच. धक्का देणारे असे विचार व्यक्त करणे वाटते तितके सोपे नाही. वास्तविक डॉ. आढावांच्या विचारात धक्का नाही, तर ती एक वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती धुडकावून लावणारे केवळ अशिक्षितच आहेत असे नाही, तर सुशिक्षितही खूप आहेत. असा काही विचार आपण मांडला तर हे आस्तिक आपली गणना नास्तिकात करतात.

वास्तविक आस्तिक-नास्तिकतेचा यात संबंध नाही. सत्यनारायणाच्या पूजेची कथा खरोखर भाकडकथा आहे. अतिरंजित, अवास्तव, कपोलकल्पित अशा कथा गुंफून या पूजेकडे भाबड्या लोकांना पूर्वी ब्राह्मण-भिक्षुकांनी आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. तोच प्रयत्न विसाव्या शतकात, विज्ञान युगात चालू राहावा याचे आश्चर्य वाटते.

ब्राह्मण-भिक्षुकांच्या पोटापाण्याची व्यवस्था या भाकडकथेमुळे होत असेल; पण ही कथा हल्लीच्या काळात बंद झाली पाहिजे, तिच्यात परिवर्तन घडवून आणले पाहिजे. सुशिक्षितांनी देखील अंतर्मुख होऊन ह्या भाकडकथेचा त्याग केला पाहिजे. वाटले तर कालानुरूप नवीन रूप या पूजेला देता आले तर पहावे.

सर्वांनी एकत्र येण्याची जी या पूजेतील भावना आहे, ती ठीक आहे. ती भावना वेगळ्या रूपात प्रदर्शित का करू नये ? ब्राह्मणभिक्षुकांनी या नव्या रूपाचा विचार करावा. तसेच सुशिक्षितांनी देखील ह्या भाकडकथेचा चोथा फेकून द्यावा, हे ठीक.

डॉ. आढावांचा लेख प्रसिद्ध केल्याबद्दल आपणास धन्यवाद.

**श. रा. राणे**, फैजपूर

# म्हैसाळ–मुंबई

श्रीविठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी लिमिटेड, म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली ही सस्था हरिजन विकासाचा महाराष्ट्रातील एक नवा प्रयोग आहे. अनेकांनी या प्रयोगाला सामाजिक न्यायभावनेपोटी आजवर हातभार लावलेला आहे. संस्थेतर्फे प्रकाशनार्थ देण्यात आलेली पहिली देणगीदार यादी माणूस, १९ फेब्रुवारी, १९७२ या अंकात प्रसिद्ध झाली. ही दुसरी यादी—

| देणगीदाराचे नाव | रु. पैसे |
|---|---|
| श्री. डी. एम. नेतरवाला | २००–०० |
| जयवंत दळवी | १०१–०० |
| मुकुंद सहस्रबुद्धे | ५०–०० |
| सुनीती पानसे | १०–०० |
| सरदार इरफान | १०–०० |
| डॉ. ई. एम. गोळे | २५–०० |
| रा. क. कामत | २५–०० |
| द. गो. पाध्ये | ५–०० |
| वं. एस्. एम्. जोशी | ५–०० |
| भालचंद्र पुरंदरे | २५–०० |
| श्री. पद्माकर वझे | १००–०० |
| जयवंत स. जोगळेकर | २५–०० |
| एस्. डी. पंडित | १०१–०० |
| बी. बी. बागलकोटे | ५१–०० |
| अशोक जैन | २५–०० |
| प्र. ना. सोमण | १०१–०० |
| के. वाय. नलवडे | ३५–०० |
| बी. व्ही. बागलकोटे | २५–०० |
| द. गो. गुप्ते | ५०–०० |
| के. डी. मुळेकर | १००–०० |
| व्ही. एम्. सिद्धे | १००–०० |
| दीपलक्ष्मी मासिक | २५१–०० |
| ब्रॅडमा ऑफ इंडिया लिमिटेड | ३००–०० |
| एम्. जी. कुलकर्णी | १०१–०० |
| अनंत आठवले | १००–०० |
| पु. ह. पालकर | १००–०० |
| वि. स. पाटील | ५१–०० |
| मंगेश पाडगावकर | ५१–०० |
| द. व्य. दाणी | २५–०० |
| धो. वि. देशपांडे | १०–०० |
| दि लिबर्टी एन्टर प्रायझेस प्रायव्हेट लि. | ५००–०० |
| आ. कृ. जोशी | १०१–०० |
| रमेश मंत्री | ५१–०० |
| बी. वी. बागलकोटे | ५०–०० |
| श्रीकृष्ण शिदोरे | २५–०० |
| दि राष्ट्र सवर्धन निधी | ३०००–०० |
| दि फलटण शुगर वर्क्स | १०००–०० |
| नलिनीबाई डहाणूकर चॅरिटी ट्रस्ट | ५००–०० |
| जयंत साडगावकर | १०१–०० |

| | | |
|---|---|---|
| श्री. | आर. डी गोखले | १०१–०० |
| | सुधाकर परांजपे | १०१–०० |
| सौ. | कुंदा अरुण चेंबूरकर | २५–०० |
| श्री. | वाय्. डी. लोकूरकर | २५–०० |
| श्रीमती | मितीन मधुकर गुप्ते | २५–०० |
| सौ. | आशा म्हात्रे | १५–०० |
| कु. | अलका विश्वनाथ कवळे | १०–०० |
| श्री. | जोशी (ठाणे) | ५–०० |
| | विजय वैद्य | २५–०० |
| | डॉ. सौ. शोभा ज. जोगळेकर | ५००–०० |
| | दुलेराय रतिलाल मेहता चॅरिटेबल ट्रस्ट | ५०१–०० |
| | प्रभाकर कोल्हटकर | १०१–०० |
| | दि ओरिएन्टल मेटल वर्क्स, वरळी | २००–०० |
| | रामभाऊ साठे | १००–०० |
| | वि. शं. कर्वे | १००–०० |
| | वि. शं. बर्वे | २५०–०० |
| | नानासाहेब नरवणे | १०१–०० |
| | व्हि. ए. फडके आणि कंपनी सॉलिसिटर्स | १०१–०० |
| | नवभारत मित्रमंडळी | १००–०० |
| | शंकर द. भागवत | १०–०० |
| | गजानन गोपाळ फडके | ३१–०० |
| | वसंत रामचंद्र वर्तक | १०–०० |
| | ज्ञानेश्वर नाडकर्णी | १००–०० |
| | चि. वि. कुलकर्णी | २५–०० |
| | एकूण | १०,०४८–०० |

## तरुणांना अरुणाचलात सुवर्णसंधी

अ. भा. शांती सेनेचे संयोजक श्री. नारायणभाई देसाई हे नुकतेच शिलाँग दौऱ्यावर असताना अरुणाचल प्रदेशाचे (नेफा) चीफ कमीशनर यांना भेटले. तरुणांचे आणि विशेषतः शांती सेनेचे काही काम अरुणाचल प्रदेशामध्ये सुरू व्हावे अशी इच्छा कमीशनरांनी व्यक्त केली. झालेल्या चर्चेतून तरुणांकरिता खालील कार्यक्रम निघालेत. १ : नयी तालीम सिद्धांतानुसार काही निवडक जागी विशेष प्रयोगात्मक शाळा चालविणे. यात नवीन प्रयोग होतील. आधुनिक विज्ञानाचेही ज्ञान होईल. २ : युवकांचे प्रादेशिक व जिल्हावार शिबिरे घेऊन अरुणाचलमधील तरुणांमध्ये विधायक नेतृत्व निर्माण करणे. ३ : काही निवडक ठिकाणी त. शां. से. चे सक्रीय केंद्र चालविणे ४ : सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा अरुणाचलचे नृत्य व गीत आत्मसात करून भारतातील अन्य भागात नृत्यगीतांचे आदानप्रदान करणे. अरुणाचलमध्ये अशा तऱ्हेने संघटनात्मक कार्य उभे राहू शकते. याकरिता श्री. नारायणभाईंनी तरुणांना आवाहन केले आहे. ज्या तरुणांना हे आवाहन स्विकारण्याची इच्छा असेल त्यांनी संयोजक, तरुण शांती सेना, महाराष्ट्र विभाग, मु. पो. गोपुरी जि. वर्धा या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. (सप्रेस)

□ □ □

# अंतरंगी रंगलेल्या हरिविनायकांची मुलाखत

स्नेहांकित

पुण्याचे नागरिक, लोकप्रिय शिक्षक, विनोदी लेखक, नाटककार श्री. हरि विनायक वाडेकर यांनी नुकतेच एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केले. वय वाढलं तरी शरीर ताजच राहिलं, तसच मनही ! खळखळून येणारं हास्य अजून शिल्लक आहे, तसंच ते तिरकस बोलणंही ! आपल्या तिरकस लेखणीने एक काळ त्यांनी गाजविला होता. 'जनता एक्स्प्रेस' 'हरि विनायक' 'मी हा असा आहे' ही त्यांची पुस्तके याची साक्ष देतील. अध्यात्माची कास धरल्याने अंतर्मुख बनलेल्या मनाची ही झलक 'माणूस'च्या वाचकांना सादर करीत आहे. श्री. वाडेकरांना या निमित्ताने आम्ही दीर्घ-आयु-आरोग्य लाभो अशी त्यांच्याच उपास्य देवतेजवळ (ज्ञानदेव) प्रार्थना करितो,

: आपला जन्म ?

वाडेकर : अस्सल पुणेकर आहे आणि तसाच अखेरपर्यंत रहाणार.

: साठावं वर्ष धोक्याचं आहे का सुखाचं ?

वाडे : उमजण्याचं आहे !

: एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केलंत, तेव्हा आता आत्मचरित्राचा संकल्प वगैरे सोडला की नाही ?

वाडे : आत्मचरित्राचा संकल्प सोडणं हे का श्राद्धाचा संकल्प सोडण्याइतकं सोपं आहे ? आत्म्याचं चरित्र ते आत्मचरित्र, अंतर्मुख आत्म्याचा अविष्कार ते आत्मचरित्र ! ते चरित्र सगुण झालं पाहिजे, परमपवित्र झालं पाहिजे, आणि पुढल्या पिढीनं सादर वंदावं असं झालं पाहिजे.

: म्हणजे सध्या तरी आत्मचरित्राचा विचार नाही तर. बरं, आपण लेखणी हाती धरली केव्हा ?

वाडे : लेखणी मी अजून हाती धरलीही नाही आणि अजून सोडलेलीही नाही.

: म्हणजे काय ?

वाडे : हा माझा छंद आहे, विरामस्थान आहे !

: आपल्या बरोबरीचे लेखक पुढे गेले—

वाडे : प्रश्न आला लक्षात माझ्या. बरोबरीचे लेखकमित्र पुढे गेले का मागे राहिले ह्याचा मी कधीच विचार केला नाही. मी माझ्याच चालीने चालत होतो आणि अजूनही माझी चाल तशीच आहे.

: लेखन हा जीवनाचा व्यवसाय,

उपजीविकेचं साधन असावं की नाही ?

वाडे : अजिबात असू नये, घराचं गेस्ट हाऊस करण्यासारखं आहे, यात काय ते समजा, तो जीवनाचा धर्म असावा, धंदा असू नये.

: आधुनिक मराठी 'ललित वाङमय' कुठं आहे ? या वाङ्मयाला गंध आहे का ?

वाडे : भोगवादाच्या भट्टीत, याला गंध आहे तो उकळणाऱ्या सरसाचा ! अपवाद फार थोडे आहेत. उल्लेखाचं पुण्य नको आणि अनुल्लेखाचं पाप नको.

: आपण शिक्षक होता–

वाडे : अजूनही माझं त्या पेशावर नितांत प्रेम आहे. शिक्षक जन्मावा लागतो. अलिकडे शिक्षक 'तयार' होत आहेत. जन्मसिद्ध शिक्षक आमचे नाना नारळकर ! आपल्या पुढल्या प्रश्नाचं उत्तर आताच देऊन टाकतो. 'विद्यार्थी बेशिस्त आहेत का ?' हक्कांची अकाली जाणीव झाली, आणि संयमाचं सामर्थ्य येण्यापूर्वीच संचार सुरू झाला. कळलं तर वळलं पाहिजे, आणि वळलं तरी घठलं पाहिजे !

: आपण आयडियल एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांपैकी एक आजीव सदस्य होता, तेव्हा त्यासंबंधी काही–

वाडे : जे दिल्लीत तेच गल्लीत ! प्रतिकूलतेत माणसाला मनं असतात, मतं नसतात. अनुकूलता आली की मनं मरतात आणि मतं सैतानासारखी नाचू लागतात. सहकार्य संपतं आणि संख्या-बलाचं वारं अंगात शिरू लागतं. मतानं जो बळी तोच कान पिळी.

: तत्त्व बोललात–

वाडे : तपशील सांगण्यात रस नाही.

: एखादी संस्मरणीय आठवण सांगा.

वाडे : आठवण नाही सांगत, व्यक्ती सांगतो ! शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे वडील आमच्या इंग्रजी शाळेत चित्रकला शिक्षक होते. मी मामांजवळ बसून त्यांनी कुटलेला विडा खावयाचा आणि त्यांच्या तोंडून रंगलेल्या ऐतिहासिक गोष्टी ऐकावयाचा. आमच्या मामांनी जनकोजी शिंद्याची गोष्ट अशा बहारीने सांगितली की बोलता सोय नाही. नाटककार कै. नानासाहेब गोखले गप्पा मारण्यासाठी येत असत. मी म्हटलं, 'नानासाहेब, हे मामा, जनकोजी यांच्याकडून ऐका आणि नाटक लिहा.' मामांनी असा कथनात रंग भरला की दुसऱ्या दिवशी एक अंकच नानासाहेबांनी लिहून आणला. पुढे भरत नाट्य मंदिरने ते नाटकही रंगभूमीवर आणले. दुसरी व्यक्ती म्हणजे समाजवादी नेते मधु लिमये यांचे वडील रामभाऊ लिमये. त्यांचा चेहरामोहरा हिटलरसारखा दिसे ! रामभाऊंचं हाड शिक्षकाचं होतं आणि मन कुबेरासारखं होतं. शिक्षकाच्या खोलीत आमच्या गुजगोष्टी घंटेच्याच टोलाने विराम पावयाच्या. सूर संपला तरी मैफलीची धुंदी उतरत नाही असा प्रकार मामा पुरंदरे आणि रामभाऊ लिमये ह्यांच्याबद्दल आहे !

: आपण संस्थेसाठी काय केलं, आणि

वाडे : पुन: अवघड प्रश्न ! प्रवृत्ती राबविली आणि आता उरली ती निवृत्ती ! कोकणात बाजरी पेरण्याचे परिश्रम घेतले. घाम निघाला, पण काम साकारलंही नाही आणि आकारलंही नाही; आपला हातगुण म्हणा, पायगुण म्हणा. त्याबद्दल विफलता नाही, पण क्षणिक खिन्नता मात्र येते. ३१ वर्षे कापरासारखी पाहता पाहता उडून गेली!

: नाटके आपण लिहिलीत, आपण कुणाला मानता ?

वाडे. : खाडिलकरांना आणि आचार्य अत्र्यांना.

: नटात अविस्मरणीय कोण ?

वाडे. : बालगंधर्व आणि केशवराव दाते. बालगंधर्व म्हटलं की सारंच आठवतं. वैभव आणि वनवास ! मला फार मोठं तत्त्वज्ञान बालगंधर्वांच्या विकलांग परिस्थितीतील भेटीनं सांगितलं. बालगंधर्व केविलवाण्या आणि सुरेल असहाय्य स्वरात सांगत होते, " बाप्पा, जोपर्यंत आपल्याजवळ काही आहे तोपर्यंत सारं जग आपलं, पण आपल्याजवळचं सरलं की देवा, ज्याचा तो, देवा ज्याचा तो वरं. "

: आपल्या वयाच्या षोडशीपासून एकसष्ठीतही पुणे नगरवाचन मंदिरात आपली बैठक आहे.

वाडे. : पुणे नगरवाचन मंदिर माझं आरामधाम आहे, माझे ते सॅनिटोरियम आहे. मन ताजं ठेवण्याचा तो रेफ्रिजरेटर आहे !

: आपण जीवनात कमावलं काय आणि गमावलं काय ?

वाडे. : ना नफा ना तोटा असाच जीवनाचा धर्म आहे. कमावलं ते हाती रहात नाही; आणि गमावलं ते हाती पुन: येत नाही. आयुष्य वेचताना गोवऱ्या वेचाव्या लागतात, फुलेही वेचावी लागतात. फुलं वेचताना, त्याच्या परिमलानं दरवळलेल्या स्मृतीच्या गंधाचं स्मरण ठेवावं. मी ते ठेवलं आहे. लढाईतील वार प्रहार विसरलो, पण धैर्यधनाची कमाई विसरता येणार नाही. जीवनात कधी गड येईल, सिंह गमावेल, पानपत होईल, पण उरावा तो स्मरणात – सदाशिवरावभाऊंचा सिंहासन फोडणारा घण ! टिळक आठवावेत ते मंडालेतील गीतारहस्य लिहिणारे, मुंबईच्या हायकोर्टात देवाची इच्छा आणि देवाघरचा न्याय सांगणारे !

: तुम्ही बोललात ते समजलं आणि उमजलंही. आपण ज्ञानदेवाचे उपासक आहात.

वाडे. : अनुभव सांगणार नाही, अध्यात्मावर बोलणार नाही.

: ठीक आहे.

वाडे : काय अखेर व्हावं ते मात्र सांगतो. ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यावर नामदेव म्हणाले, ' जो जो दिवस उगविला । तो तो ज्ञानदेवे सफल केला । '

हरिविनायकाबद्दल असं बोलणारा एखादा तरी नामदेव कुठेतरी असावा. तो नसला तरी हरिविनायकांच्या आत्मदेवाला तरी अखेर वाटावं, " जो जो दिवस उगविला । तो तो ' हरिविनायके ' सफल केला–! '
काय उरलं ?

□ □ □

# माणूस

दोन वर्षांची ४५ रुपये वर्गणी

दिवाळीपूर्वी पाठवणारास

## स्नेहांकिता

स्नेहप्रभा प्रधान : किंमत सुमारे २५ रुपये

हे एक पुस्तक

किंवा

## कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके : किंमत १० रुपये

## रातराणी

विजय तेंडुलकर : किंमत १२ रुपये

ही

दोन पुस्तके

विनामूल्य

भेट

चालू डिसेंबरात : ट. ख. वर्गणीदारांचा

# मुख्यमंत्र्यांचा अभिनव उपक्रम

सौ. तारा पंडित

आमच्या पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थ शंकर रे यांनी एक अभिनव असा पायंडा घालून दिला आहे. त्यांना विद्यार्थ्यांमध्ये—ह्या उमलत्या पुष्पामध्ये कमालीचा रस वाटतो हे निश्चित. ते सिद्ध करून दाखवण्यासाठी त्यांनी या वर्षी हायर सेकंडरी परीक्षेत पास झालेल्या प्रत्येक ग्रुपमधील पहिल्या दहा यशस्वी विद्यार्थ्यांना स्वतःकडून चहाचे आमंत्रण केले. विद्यार्थ्यांना हा एक आश्चर्याचा धक्का होताच पण पालकांना व शिक्षकांना देखील हे सारे नवेच वाटले. ह्या लहान बालकांविषयी मुख्यमंत्र्यांनी विचार करावा, त्यांना चहाला आमंत्रण करावं आणि त्यांच्याशी बोलण्यासाठी वेळ काढावा ही इतिहासात न घडलेली गोष्ट. मुख्यमंत्री भेटले तेव्हा एकदम ह्या ७०-८० मुलांना नव्हे. (प्रत्येक ग्रुपचे दहा विद्यार्थी ह्या हिशोबाने ७०-८० होतातच.) तर दहाबारा विद्यार्थ्यांचे ग्रुप वेगवेगळ्या वेळेला बोलावले. जेणेकरून त्यांना प्रत्येक विद्यार्थ्यांशी दोन शब्द बोलता येतील. प्रत्येक दिवशी त्यांनी अर्धापाऊण तास ह्या विद्यार्थ्यांसमवेत घालवला. मुख्यमंत्री आपल्या शेजारी बसून गप्पा मारताहेत हा अनुभव विद्यार्थ्यांना अत्यंत सुखावह होता.

चहा–खाणं–फोटो ह्या बरोबरचं प्रत्येकाची व्यक्तीगत ओळख करून घेऊन पुढील विचार काय आहे अशी मुख्यमंत्र्यांनी चौकशी केली. त्याचे-बरोबर तुम्हाला काही सूचना मांडायच्या आहेत का म्हणून विचारले.

सायन्स ग्रुपमधील एक मुलगा व फाईन आर्टस् ग्रुपमधील एक मुलगी यांनी अभिनव सूचना मांडल्या. तो विद्यार्थी म्हणाला–मी हिंदू स्कूलमधून मेरिटमध्ये आलो आहे. पण आमच्या शाळेचे नाव हिंदू स्कूल का? तेथे मुसलमान विद्यार्थ्यांना प्रवेश का नसावा? हे तर संकुचितपणाचे लक्षण होय. एक तर आमच्या शाळेचे नाव बदलावे आणि दुसरे म्हणजे मुसलमान विद्यार्थ्यांनाही तेथे प्रवेश देण्यात यावा.

फाईन आर्टस्‌ची महाराष्ट्रीय विद्यार्थिनी म्हणाली–तुम्हाला कलकत्ता शहराची फुलबाग बनवायची आहे ना? आम्हा सर्व विद्यार्थ्यांना कामाला लावा. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत शारीरिक श्रम सक्तीचे ठेवावेत. शरीरश्रमाची प्रतिष्ठा विद्यार्थ्यांना समजायला हवी. आपल्याकडील बुद्धीमंतांना शारीरिक कष्ट करण्याची लाज वाटते व म्हणूनच बुद्धीमान व शरीरकष्ट करणारे यांच्यामध्ये फार मोठी तफावत आढळून येते. अशा तऱ्हेचा श्रमसंस्काराचा एक प्रयोग गेली पाच वर्षे महाराष्ट्रात होत आहे. डॉ.

आपटे नावाचे समाजकार्यकर्ते दर वर्षी उन्हाळ्यात यूथ कँप घेतात. त्यात साऱ्या भारतातून विद्यार्थी येतात. एखाद्या विशिष्ट प्रॉजेक्टवर काम करतात. त्यांना फार उत्साह वाटतो. ह्या यूथ कँपमुळे आंतर-भारती (नॅशनल इंटिग्रेशन)चे ध्येयदेखील फार मोठ्या प्रमाणावर साध्य होऊ शकेल. अशा तऱ्हेचा प्रयोग आपण येथे का करू नये ?

मुख्यमंत्री ऐकतच राहिले. म्हणाले– ठीक आहे. तू फार छान सूचना मांडलीस. मी तिचा अवश्य विचार करीन.

शेवटी ह्या सर्व मुलांना आयुष्यात यशस्वी व्हा असा आशीर्वाद देऊन आणि काही अडचणी आल्यास सरळ माझ्याकडे या, मी तुम्हाला मदत करीन असे आश्वासन देऊन त्यांनी प्रेमाचा निरोप दिला.

असा हा अभिनव उपक्रम ! कुणी म्हणेल लोकप्रियता वाढवण्यासाठी केलेला हा उपद्व्याप आहे. कुणी काही म्हणो, आपले मुख्यमंत्री आपले जवळचे आप्त आहेत ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणं हे सुद्धा काही कमी नाही. इतर राज्यातील मुख्यमंत्र्यांनीसुद्धा श्री. सिद्धार्थ शंकर रे यांच्या जोड्यात पाय घालून पाहायला काही हरकत नाही. ◻

## एका अपूर्व नामकरणाची गोष्ट

'कलदिया' हे एका काल्पनिक शहराचं नाव आहे. एक मित्र नेहमी वापर करीत असतो या नावाचा. कलकत्ता आणि हलदिया ह्या दोन शहरांचं लग्न लावून त्यांच्या अपत्याचं नाव मोठ्या कल्पकतेने त्याने 'कलदिया' असं ठेवलं. काही का असेना पण ह्या नावामुळे कल्पनेचे तारे तुटायला लागले खरे ! सद्यपरिस्थिती लक्षात घेता भविष्यकाळाला एका विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा जन्म झालेला आढ-

[ पृष्ठ ५९ वर ]


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

## सांस्कृतिक मुंबई

# दोन कार्यक्रम
# षण्मुखानंद हॉल

विनय धुमाळे

मुंबईवर अनेक लोक अनेक कारणास्तव नाराज असतात. जागेचा प्रश्न लोकलमधली गर्दी, वगैरे वगैरे. परंतु हे सर्व असूनही मला मुंबई फार आवडते. याची कारणे अनेक आहेत. परंतु त्यातले महत्त्वाचे म्हणजे दर महिना दीड महिन्याला मुंबईत होणारे सुब्बुलक्ष्मीचे गाणे. बाकी कुठल्या शहरात सुब्बुलक्ष्मीचे गाणे या फ्रिक्वेन्सीने होत असेल असे वाटत नाही. गेल्याच आठवड्यात षण्मुखानंद हॉलमध्ये तिच्या भजनाचा कार्यक्रम झाला. मुंबईतल्या संगीत समीक्षकांना टीकेकरता संधी न देणारी दोन हुकमी माणसे म्हणजे एक सुब्बुलक्ष्मी व दुसरे मल्लिकार्जुन मन्सूर. सुब्बुलक्ष्मीच्या कार्यक्रमाचे रिपोर्ट कधीही कुठल्याही पेपरात वाचा. एकजात स्तुती. हिचं गाणंच मुळी असं आहे, की टीकेला जागाच नाही. परवाचा षण्मुखानंद हॉलमधला भजनाचा कार्यक्रम पण असाच बेफाट झाला. अतिशय आनंदाची गोष्ट म्हणजे संपूर्ण हॉल (३६०० जागा) भरला होता. रसिक वर्ग केवळ दाक्षिणात्यच होता असे नाही तर सारा जनसमुदाय अक्षरशः कॉस्मॉपॉलिटन होता. सगळ्या प्रांतांचे लोक तेथे अगदी तन्मयतेने तिची भजने ऐकत होते. फार बरं वाटलं ! सुब्बुलक्ष्मीच्या आवाजाचे मी वर्णन करणे म्हणजे ते हास्यास्पद होईल. पण एकच म्हणता येईल, की प्रत्येक भजनाची जी भावना असते ती स्वतःच्या आवाजाने ओतप्रोत व्यक्त करते. तिचा आवाज म्हणजे साक्षात् गोडवा.

प्रथम सुब्बुलक्ष्मीने त्यागराजाचे रामन्नु ब्रोवरा हे पद म्हटले. या पहिल्याच पदाने तिने सर्वांना जिंकले. नंतर तिने अनेक पदे म्हटली. हिंदीपद हरी तुम हरोच्या वेळी तर रसिकवर्ग अक्षरशः दाद देण्यास्तव तुटून पडत होता. मग तिने मुंबईकरता एक खास चीज काढली 'बारे पांडुरंगा', लाजवाब. या भजनात थोड्याश्या दाक्षिणात्य छटा दाखवून तिने बहार केली. मग बंगाली लोकांकरता म्हटलेले आमार जन्मभूमी हेही फारच रंगले. सुब्बुलक्ष्मीच्या गाण्याला जनसमुदाय पण कॉस्मॉपॉलिटन होता आणि तिच्या भजनाची निवड पण तशीच कॉस्मॉपॉलिटन होती. अनेक दिवस स्मरणात राहील असा हा कार्यक्रम झाला.

दुसऱ्याच दिवशी परत षण्मुखानंदला जायचा योग आला. कुठलातरी

एक व्हरायटी एन्टरटेन्मेंट–शो होता. मला स्वत:ला काही याचे फारसे आकर्षण नाही. त्या ठराविक सिने नकला आणि ठराविक प्रेक्षकवर्ग ! कंटाळा येतो. पण यावेळी मुद्दाम गेलो. आकर्षण होते– 'रामदास पाध्ये.' बोलक्या बाहुल्या फेम. यांच्याबद्दल बरेच काही ऐकले होते. त्यामुळेच त्यादिवशी आवर्जून त्या कार्यक्रमाला गेलो. विश्वास बसणार नाही अशी कला या माणसाजवळ आहे. अहो, तो अक्षरश: पोटातनं बोलतो. त्याने बाहुल्या अर्धवटराव आणि आवडाबाई बोलत्या करताक्षणीच सभागृहात हास्याचा प्रचड स्फोट झाला. या माणसाने खरोखर फार अद्भुत कला हस्तगत केली आहे. तोंड संपूर्ण बंद व ओठांची हालचाल जराही न होऊ देता हा बोलू शकतो. गंमतीदार संवाद त्याने बाहुल्यांच्याबरोबर बसवले आहेत. त्या कार्यक्रमाचे यश म्हणजे बाहुली बोलत असताना पाध्यांच्याकडे कोणीसुद्धा बघत नाही. सारेजण बाहुलीवर लक्ष केंद्रित करतात. त्या क्षणी दोन क्षणी वाटतसुद्धा नाही, की पाध्येच बोलताहेत. ही अत्यंत कठीण कला दिसली. कारण बाहुल्यांचे ओठ, डोळे वगैरे वाक्याप्रमाणे व्यवस्थित एक्स्प्रेशन देत होते. म्हणून मुद्दाम कार्यक्रम झाल्यावर त्यांना भेटलो. त्यांनी सांगितलेली माहिती ऐकून खरोखर अभिमान वाटला. रामदास आणि त्यांचे बंधू राजेंद्र या दोघांनीही ती कला हस्तगत केली आहे. त्यांच्या वडिलांपासून (श्री. यशवंत पाध्ये). या कलेची सुरुवात म्हणजे अक्षरश: श्वास घेणे आणि श्वास सोडणे यावर हुकमत आणण्यापासून. नंतर नंतर शब्द आतून फेकण्याचा सराव करावा लागतो. याला ७–८ वर्षे सहज लागतात. (नक्की शब्दध्वनी घश्यातून होतो का पोटातल्या स्नायुद्वारे होतो यावर थोडंसं संशोधन झालं पाहिजे.) नंतर बाहुलीच्या आत ज्या कळा असतात त्या दाबण्याचा व त्याद्वारे बाहुलीच्या ओठाच्या ज्या हालचाली असतात त्या व स्वत:चे बोलणे हे व्यवस्थित सिंक्रोनाइज करावे लागते. मग हे सिंक्रोनाइझेशन एकदा का व्यवस्थित पार पडले की कोणाला संशयसुद्धा येत नाही, की बाहुली फक्त ओठ हलवत आहे आणि बोलविता धनी वेगळाची आहे म्हणून. मधे पाध्ये अमेरिकेचा दौरा करून आले. प्रचंड रिस्पॉन्स मिळाला त्यांना. त्यांना आता एक सुरेख संधी प्राप्त झाली आहे. दूरचित्रवाणी. कारण हा कार्यक्रम दूरचित्रवाणीकरता प्रचड लोकप्रिय होईल. बघू त्यांना कशी काय संधी मिळते. □

इथल्या एका एंजीनिअरिंग कॉलेजने लोकांना धक्काच दिला. व्हि. जे. टी. आय. लिटररी अॅसोसिएशनने एक व्याख्यान अॅरेंज केले होते. विषय होता कंरपेंटरी अॅडोलसन्स इन इंडिया आणि व्याख्याते – श्री. दिलीप चित्रे. एका तंत्रमहाविद्यालयाने एव्हढ्या गंभीर सामाजिक विषयावर भाषण ठेवावं याचे कौतुक वाटले. दिलीप चित्र्यांनी एक तासभर भाषण केले व लहानश्याच

परंतु कॉंपॅक्ट श्रोतेवर्गाला खिळवून ठेवले. त्यांच्या भाषणातला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्याकडे परिस्थिती अशी आहे, की प्रत्येकजण आपले ॲडोलसन्स (पौगंडावस्था) संपू देत नाही. ती अवस्था तो वाढवायला बघत असतो. कारण या अवस्थेत जी एक मानसिक बेफिकीरी आणि आनंद असतो तो दुसऱ्या अवस्थेत मिळू शकत नाही. कोणालाही सत्याला सामोरं जायचं नसतं. मानसिक तयारी नसते. त्याकरता आपल्या येथे बऱ्याच लोकांच्या वागणुकीत पौगंडावस्था दिसून येते. तरुणांच्या संदर्भात बोलताना ते म्हणाले की पहिली परीक्षा संपल्यावर 'नोकरी' या दारुण सत्याला त्यांना सामोरे जावे लागते. त्याकरता कॉलेजमधे असताना आपल्या येथले तरुण अजूनही आपली पौगंडावस्थाच टिकवण्याचा प्रयत्न करत असताना दिसतात. प्रत्येकजण आपल्या पातळीवर हेच करत असतो.

तंत्रमहाविद्यालयात एवढ्या महत्त्वाच्या परंतु गंभीर विषयावर भाषण ठेवून थिल्लर कार्यक्रमांची परंपरा मोडल्याबद्दल संस्थेचे चिटणीस श्री. विवेक वागळे आणि द्वारकानाथ संझगिरी यांचे अभिनंदन केले पाहिजे.

□ □ □


**इंदिरा—**

**समाजवादाची सम्राज्ञी**

**चंद्रशेखर मराठे**

**माणूस दिवाळी अंक**

# आ ले पा क

■ श्री. मोहन धारिया म्हणतात : 'एखादा पुढारी माझ्याविषयी काय बोलतो याला मी किंमत देत नाही.'

'हा पुढारी कधी कधी मी स्वतःच असतो', असे ते पुढे म्हणाले की नाही ते कळले नाही.

■ बंद पडलेल्या गिरण्या-कारखान्यांवर होणाऱ्या कम्युनिस्ट सत्याग्रहाचे "स्वरूप टाळेतोड सत्याग्रह" असे राहणार आहे.

ते आपले सुरुवातीला. पुढे तो टाळकेतोड सत्याग्रहच होणार.

■ 'आपण आमदार असल्याने शासनाच्या धोरणाला विरोध करणे आपणाला परवडणारे नाही' असे मत श्री. वसंतराव होशिंग यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या बैठकीत मांडले.

त्यातून आपले नावही गैरसोयीचे आहे, अशीही सबब श्री. होशिंग यांना सांगता येईल.

■ 'सोबत'कार श्री. ग. वा. बेहरे यांनी 'या युवाशक्तीचे होणार तरी काय? (उत्तरार्ध)' या लेखात म्हटले आहे की : क्वचितप्रसंगी तरूण स्त्रीपुरुषांच्या हातून नवानुभवामुळे आपल्याला न रुचणारे काही प्रकार घडतील; पण त्यांनी आपण बिचकून जाता कामा नये.

आम्ही नाही हो बिचकत. बिचकतात ते तुमचेच पुणे, मुंबई, नागपूर येथील युवकांची हालचाल न्याहाळणारे सदरकार.

■ 'न्यूजवीक'ने जपानचे वर्णन 'कॉम्प्यूटराइझ्ड बुल्डोझर' या दोन शब्दात केले आहे.

भारताचे वर्णन दोन शब्दात करायचे झाल्यास ते 'मेकॅनाइझ्ड बुलक-कार्ट' असे करता येईल.

■ बॅ. विठ्ठलराव गाडगीळ एका भाषणात म्हणाले: कामचुकारपणा ही जणू आजच्या काळात एखादी अभिनंदनीय कृती होऊन बसली आहे.

हे तुम्ही कुटुंबनियोजनाबाबत बोलत असाल तर खरेच आहे ते !

'महाराष्ट्र राज्य हे देशासाठी

वाटल तो त्याग करणारे राज्य आहे' मुख्यमंत्री वसंतराव नाईक.

बेळगावचासुद्धा ?

■ मुंबईतील टी. व्ही. उद्घाटन-प्रसंगी फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीचे राजदूत श्री. गुंथर डील म्हणाले: टी. व्ही. हे माध्यम जगाची खिडकी आहे.

पण आम्ही त्या खिडकीला खास भारतीय बनावटीचा खादीचा पडदा लावणार त्याचे काय ?

■ एस्. टी. भाडेवाढविरोधी सत्याग्रह कार्यक्रमाबाबत जनसंघातर्फे काढण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की : राज्यभरच्या निदर्शनात १० लाखावर लोकांनी भाग घेतला.

काँग्रेसचे काही बोगस सभासद जनसंघात गेले की काय ?

■ सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. शांता जोग एका मुलाखतीत म्हणाल्या: नटाच्या–नटीच्या नाईटमुळे नाटकांचे दर वाढलेले नाहीत.

या समस्येची बारकाईने पाहणी केल्यावर आमचेही मत असे झाले की नट–नटींच्या नाईटमुळे नाटकांचे दर वाढलेले नाहीत; दर वाढले त्याला कारण डोअरकीपरची नाईट !

■ पी. के. सावंत महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस संघटनेत आमूलाग्र बदल करणार आहेत.

अहो खोगीर बदलले म्हणून टांग्याचा घोडा शर्यतीचा घोडा थोडाच होणार आहे ?

■ बंद गिरण्यांच्या प्रश्नावर आवेशपूर्ण भाषण करताना कम्युनिस्ट नेते कॉ. डांगे म्हणाले : हे सरकार स्वतःला 'गांधीवादी' म्हणविणारे सरकार आहे.

अहो 'गांधीवादी' म्हणजे इंदिरा गांधीवादी ! आता हेसुद्धा आम्ही तुम्हाला सांगायचं म्हणजे हद्दच झाली.

■ वरील भाषणात ते पुढे म्हणाले : संप करावा लागला तर तो केलाच पाहिजे; परंतु वाटेल तेव्हा संप ही भूमिका आम्हाला अमान्य आहे.

हे मात्र काहीच्याबाहीच बोलणे झाले. सरकारला वाटेल तेव्हा संप करायची भूमिका तुम्हाला मान्य असायला हरकत नसावी.

■ महाराष्ट्र सरकारच्या साखरेबाबतच्या धोरणाचा समाचार घेताना एक विरोधी नेते म्हणाले : सर्व साखर व्यापाऱ्यांकडून विकत घेण्याचे नाटक महाराष्ट्र सरकारने केले.

महाराष्ट्र सरकारपुरस्कृत हा आणखी एक सुविहित नाट्यप्रयोग !

■ एका नटीने म्हणे दीडशे हिंदी चित्रपटात आईची सुरेख भूमिका केलेली आहे.

तिचे डोळे पाणीपुरीसारखे असावेत, अशी माझी समजूत आहे.

■ त्रिवेंद्रम जिल्ह्याच्या ग्रामीण भागात माकडे माणसांना बराच त्रास देत आहेत म्हणे.

या प्रकाराशी माजी रेल्वेमंत्री हनुमंतय्यांचा काही संबंध असेल काय ?

□ केंद्रीय आरोग्यमंत्री उमाशंकर दीक्षित म्हणतात : आकाशवाणीने भारतापुढील सर्व आणीबाणीच्या प्रसंगांना यशस्वीपणे तोंड दिले आहे.

आणि आकाशवाणीवरील सर्व कार्यक्रमांना आम्ही आतापर्यंत यशस्वीपणे कान दिला आहे.

■ युगांडाचे जनरल अमीन म्हणतात : मीदेखील माणूसच आहे. माणसांना विनाकारण हाल सोसावे लागलेले पाहण्याची माझी इच्छा नाही.

हिटलर आणि याह्याखानसुद्धा असंच म्हणत होते.

■ जॉर्ज फर्नांडिसनी एका मुलाखतीत 'म्यूल' म्हणजे गाढव असा अर्थ सांगितला. तेव्हा म्यूल म्हणजे खेचर असा अर्थ असल्याचे एका पत्रकाराने सांगताच फर्नांडिस उद्गारले : खेचर काय नि गाढव काय, दोन्ही एकच !

याच चालीवर दक्षिण मुंबईचे मतदार म्हणतात जायंट काय आणि जायटकिलर काय, दोन्ही एकच !

□ आजचा नाटकाचा प्रेक्षक प्रगल्भ झाला आहे असे एक प्राध्यापक म्हणतात.

या निमित्ताने हे प्राध्यापक किती प्रगल्भ आहेत हे कळलं ते बरं झालं.

■ राष्ट्रीय अंधत्वनिवारण संस्थेने दिल्लीत केलेल्या एका पाहणीत असे आढळले की वयात येणे आणि दृष्टिदोषांचा आढळ यांचा घनिष्ट संबंध असावा.

वयात येण्याचा आणि दृष्टिदोषाचा प्रेमाशी घनिष्ट संबंध आहे; इतका की त्यांच्याशिवाय प्रेम उद्भवत नाही, उद्भवले तरी टिकत नाही.

■ रिपब्लिकन पक्षाच्या एका नेत्याने एका निवेदनात म्हटले आहे की : रावणाचा व बौद्ध धर्माचा अर्थाअर्थी काही संबंध नाही.

असे कसे ? दोघानाही एकाच श्रीलंकेचा आधार नाही का ?

■ रिपब्लिकन पक्षाचा एक नेता सांगतो : बौद्ध साहित्यात रावण किंवा राम यांना कसलेही स्थान नाही.

आमच्या मराठी साहित्यातही या दोघांना स्थान नाही; पण त्यांच्या शिवधनुष्याला मात्र महत्त्वाचे मोठे स्थान आहे.. हे शिवधनुष्य पाहणे, ते उचलायला पुढे सरसावणे, त्याला हात लावणे, ते पेलणे यावर मराठी लेखकांचे मोठेपण अवलंबून असते. अधिक माहितीसाठी 'ललित' मासिकातील गंगाधर गाडगीळ, वसंत कानेटकर यांची रामरावणी वाचा.

■ तमाशातील लता लंका नांदुरेकर

आणि पार्टीचे कौतुक करताना 'नवशक्ती'तून तमाशा-वृत्त लिहिणाऱ्या भाऊ मांजरेकरांनी म्हटले आहे की : एकदा या पार्टीतील सरलाबाईंनी असे काही वेगवान आणि वेधक नृत्य केले की तेथे उपस्थित असलेल्या श्री. पु. ल. देशपांडे यांनी तिची पाठ थोपटली.

हा प्रकार दिवसा झाला की रात्री झाला ते पुरेसे स्पष्ट नसल्याने श्री. ना. ग. गोरे फार अस्वस्थ होतील.

■ अमेरिकेतील वैवाहिक जीवनाची माहिती देताना एक विदुषी लिहितात : एखादी गाडी बदलावी इतक्या सहजतेने ही मोठी जबाबदार माणसे आपले ऋणानुबंध तोडून विभक्त होतात.

ही गाडी देखील अमेरिकेतील दिसते. इथे गाडी बदलणे इतके कठीण आहे की त्यामुळे घटस्फोटाचा विचारही कोणाला सहज सुचत नाही.

■ एक मागणी : " 'गोदरेज'मधील सत्य बाहेर आले पाहिजे."

हे सत्य बाहेर काढायचे म्हणजे किल्लीसुद्धा गोदरेजचीच पाहिजे !

□

## गॉड सेव्ह द क्वीन !

इंग्लंडच्या राणीचे कौतुक इंग्लंडमध्ये भरपूर होते. ज्याचे त्याचे कौतुक ज्याच्या त्याच्या वेटात व्हावे हे योग्यच आहे. पण इंग्लंडच्या राणीला द गॉलच्या फ्रान्समध्ये देखील भरपूर चाहते आणि कौतुके लाभली आहेत. ही मंडळी राणीवर बारीक नजर ठेवून असतात; आणि, राणी शिकली, राणीला उचकी लागली, राणी उजव्या गालाला आधी पावडर लावते, कपभर चहा पिण्यासाठी राणीला तेरा घोट घ्यावे लागतात, यासारख्या महत्त्वपूर्ण बातम्या ती वर्तमानपत्रातून सतत देत असतात. या बातम्यांचे 'फ्रान्स डिमाँश्रा' या नियतकालिकाचा संपादक ज्याँ मार्सिली याने संकलन करून जी आकडेवारी सादर केली आहे ती पाहण्यासारखी आहे.

१९५८ पासून आतापर्यंत राणीच्या जीवाला २९ वेळा धोका उत्पन्न झाला होता. आतापर्यंत ११ वेळा तिने गर्भधारणाप्रतिबंधक गोळ्या घेतल्या; ९२ वेळा ती गर्भार राहिली; ९ वेळा तिचा नैसर्गिक गर्भपात झाला. बिचाऱ्या राणीला, या काळात, १४९ अपघात झाले; ४३ रात्री तिने अस्वस्थ चित्ताने घालविल्या; तिला २७ दुःस्वप्ने पाहावी लागली आणि ३२ वेळा शारिरीक आणि मानसिक थकव्याने ती मोडकळली होती. ११२ वेळा तिला जीवनाचा वैताग आला होता; ६३ वेळा तिने राज्यत्याग केला होता; ७३ वेळा तिने प्रिन्स फिलिपशी जवळजवळ फारकत घेतली होती. मोनॅकोच्या राणीशी ६ वेळा आणि पर्शियाच्या राणीशी ११ वेळा ती उद्धटपणे वागली होती. लॉर्ड स्नोडॉनला १५१ वेळा राणीने दरबारातून हाकलून लावले होते.

आपल्याकडची वर्तमानपत्रे त्यामानाने पोक्त आहेत. आता एखाद्या वेळी, विमानतळावर उतरल्या तेव्हा इंदिरा गांधींची साडी गडद लिंबू रंगाची होती की फिकट गुलाबी रंगाची होती, असा वाद 'रंगतो'; नाही असे नाही. पण एरवी व्यक्तीचे फारसे कौतुक आम्ही करत नाही. त्यामुळे निवडणूक-दिवसाच्या सुमुहूर्तावर उत्तर प्रदेशातील एका गायीला दोन तोंडांचे वासरू झाले, सूर्याला भरदुपारी खळे पडले, बंगालमध्ये एका मंदिरातील कालीमातेच्या डोळ्यातून लाल आसवे गळू लागली, गडहिंग्लज येथील पाटलाच्या मळ्यातील दोडक्याच्या वेलावर भोपळे आले, या आणि अशा बातम्या आमच्या वर्तमानपत्रांना आणि त्यांच्या प्रिय वाचकांना अधिक चविष्ट वाटतात. लोकशाही आमच्या येथे खरी मुरल्याचे हे द्योतक आहे, असे मला वाटते.

□

## बालेकिल्ला ढासळला

इंग्लंड हे परंपराप्रेमी राष्ट्र आहे. या प्रेमामुळेच आपले साम्राज्य टिकवण्याचा अटोकाट प्रयत्न इंग्लंडने केला. साम्राज्य लयाला गेले तरी बेटातल्या बेटात इतर अनेक परंपरा चिवटपणे कायम राखण्याची इंग्लिश लोकांची धडपड चालूच असते. शाळा आणि विद्यापीठे तर परंपरा रक्षणाचे बालेकिल्लेच. त्यातून शतकानुशतकांच्या लहानमोठ्या परंपरांचे कसोशीने जतन केले जाते.

पण आता, कालमानानुसार, बालेकिल्ले ढासळू लागले आहेत. केंब्रिज विद्यापीठाचेच पाहा ना : केवळ मुलांसाठीच असलेल्या वीस महाविद्यालयांपैकी तीन महाविद्यालयांनी या वर्षीपासून मुलींना प्रवेश द्यायला आरंभ केला आहे. यामुळे ६४६ वर्षे चालत आलेली परंपरागत पुरुषी मिरासदारी संपुष्टात आली आहे.

त्या तीन महाविद्यालयातील मुलांना आम्ही सुयश चिंतितो !

—अनंतराव


**संध्याकाळ**


**वेधक आत्मकथन**

**गजानन जागीरदार**

**मूल्य : रुपये दहा**

**राजहंस प्रकाशन,**

**पुणे ३०.**



अमेरिकेत १९५२ च्या जुलैमध्ये मध्यरात्री दृष्टीस पडलेली उडती तबकडी

# उडत्या तबकड्यांचे रहस्य

डॉ. चिं. श्री. कर्वे

आजच्या विज्ञाननिष्ठ मानवाला देखील बुचकळ्यात पाडणारा कोणता प्रकार असेल तर तो उडत्या तबकड्या किंवा फ्लाइंग सॉसर्सचा होय. आता दिवाळीनंतर थंडीचा मोसम सुरू झाला ना म्हणजे मग उडत्या तबकड्यांचे वृत्त वृत्तपत्रात अधिकाधिक प्रमाणात प्रसिद्ध झालेले आपल्या वाचनात येईल.

महत्त्वाचे म्हणजे दुसरे महायुद्ध संपायच्या सुमारास उडत्या तबकड्यांचे देखावे दिसू लागल्याचे वृत्त प्रथम प्रसिद्ध होऊ लागले आणि त्यानंतर आतापर्यंत शेकडो वेळा उडत्या तबकड्या दिसल्याचे नमूद केले गेले आहे. यांना जरी तबकड्या असे नाव सर्वसाधारणपणे दिले गेले असले तरी त्यांचे आकार विविध तऱ्हेचे असतात. त्यातील काही बशीप्रमाणे तर काही अंडाकार, काही सिगरेटसारख्या नळकांड्याप्रमाणे तर काही चक्राकार देखील असतात. त्यांचे आकाशातील दर्शन केव्हाही म्हणजे कधी सकाळी, कधी मध्यान्हीला तर कधी रात्री देखील होते. अर्थात रात्रीचे त्यांचे दर्शन सर्वात जास्त वेळा होते. त्यांच्या संख्येबद्दलही काही बोलू नका. कधी एकच एक शंभर फुटी लांब नळकांडे दिसते तर काही वेळा तीस तीस चाळीस चाळीस गोलकांचा जथा जणू स्वर्गावर स्वारी करायला निघालेला आहे असे दृश्य दिसते. त्यांच्या वेगाची

गोष्ट तर विलक्षण असते. ताशी हजार मैल वेगापासून तो ताशी २५००० मैल वेगापर्यंत त्या झपाटयाने जाऊ शकतात. आणखी विशेष म्हणजे स्वनातीत विमाने अवघ्या हजार मैल वेगाने जाऊ लागली तर केवढा प्रचंड आवाज करतात, परंतु उडत्या तबकडयांचा आवाज म्हणून येत नाही. आतापर्यंत त्यांचे शेकडो प्रकार पाहण्यात आले आहेत, परंतु कोठेही आणि कधीही त्यांचा थोडा तरी आवाज झाला असे घडले नाही.

## केवळ दृष्टिभ्रम असावा

मौज म्हणजे एवढ्या प्रचंड वेगाने जात असताना देखील वाटेल तेथे वळण घेण्यास त्यांना जरा देखील अवघड वाटत नाही. एखाद्या कुशल कप्तानाने कधी वर, कधी खाली तर कधी एकदम काटकोनात वळण घेऊन पाहिजे तेथे त्यांना घेऊन जावे तसे त्यांचे मार्गक्रमण असते. हे सर्व प्रकार पाहून १९४७ साली अमेरिकन शासनाने त्यांचे रहस्य समजण्यासाठी एक समिती देखील नेमली नि २७ डिसेंबर, १९४९ रोजी तिचा अहवाल बाहेर पडला. त्या अहवालात, "उडत्या तबकडया या अस्तित्वात नसून त्या दिसण्याचे प्रकार म्हणजे केवळ दृष्टिभ्रम होत" असे चक्क नमूद केलेले आहे.

परंतु या अहवालाने लोकांचे बिलकूल समाधान झाले नाही नि 'हा घ्या भक्कम पुरावा' असे सिद्ध करण्यासाठी लोकांनी त्यानंतर मुद्दाम टेहळणी करून त्यांना दिसणाऱ्या उडत्या तबकडयांची छायाचित्रेच प्रसिद्ध केली. त्यावरून या उडत्या तबकडयांच्या चर्चेला पुन्हा प्राधान्य मिळाले. सामान्य वाचकाला उडत्या तबकडयांच्या देखाव्याची थोडीफार कल्पना यावी म्हणून पुढील दोन तीन प्रकार जरूर उल्लेख करण्यासारखे आहेत.

## हे घ्या पुढील पुरावे

त्यातील पहिला प्रकार खुद्द दिल्लीत १५ मार्च, १९५१ रोजी घडला. त्या दिवशी सकाळी १०॥ च्या सुमारास एक १०० फूट लांब नळकांडे दिल्ली-शहरावर घिरटया घालताना दिसू लागले. त्याच्या मागील टोकाला एक तेजस्वी कडे चकाकत होते. अदमासे ५००० फूट उंचीवरून ताशी २०० मैल वेगाने ते जात होते नि आवाज बिलकूल करीत नव्हते. पुढे ५००० फूट उंचीवरून त्याने जी उंच उडी घेतली ती २०,००० फूट उंचीला गेले नि तेथून नाहीसे झाले. दोन विमानांनी त्याचा पाठलाग केला परंतु काही उपयोग झाला नाही. विशेष म्हणजे त्यानंतर चौदा दिवसांनी पुन्हा ते तसेच दिसले व एकदम नाहीसे झाले.

आता २५ ऑगस्ट, १९५१ रोजी अमेरिकेतील टेक्सास मधील लबॉक येथे दोन वैज्ञानिकांना आकाशात एकाएकी ३० तेजस्वी दिव्यांचा जथा अर्धचंद्राकार करून जरासुद्धा आवाज न करता जाताना दिसला. थोडयाच वेळात तसाच दुसरा जथाही दिसला. हे सारे दिवे ५०,००० फूट उंचीवरून उड्डाण करीत असावेत व त्यांचा वेग ताशी १८००० मैल (जेट विमान अवघे ताशी

१०००–१२०० मैल वेगाने जाते) असावा. ३० ऑगस्ट रोजी कार्ल हार्ट नावाच्या मुलाने त्यांची छायाचित्रे घेऊन हवाई खात्याकडे 'हा घ्या पुरावा' म्हणून पाठवून दिली. या दिव्यांना 'लॅबॉकचे दिवे' असे नाव पुढे मिळाले.

अमेरिकेतील केन्टकीमधील गॉडमन विमानतळावर आणखी एक दुर्दैवी प्रसंग घडला. एक दिवस भर दुपारी १२ वाजता तांबड्या आइसस्क्रीमने काठोकाठ भरलेल्या पेल्याचा कंगोऱ्याकडील पृष्ठभाग जसा दिसावा तशी एक चक्राकार वस्तु आकाशात दिसली. तेव्हा विमानतळावरून तीन विमाने त्या वस्तुचा पाठलाग करण्यासाठी त्यापाठोपाठ गेली. त्यांचा अग्रणी कॅप्टन मँटेल होता. तो चार मैल उंचीपर्यंत त्या वस्तुच्या पाठोपाठ गेला; परंतु संध्याकाळी त्याचे मोडलेले विमान व त्याचे स्वतःचे प्रेत खाली पडलेले लोकांना मिळाले.

## 'UFO' चे चमत्कार

हे सर्व प्रकार पाहून अमेरिकन शासनाने पुन्हा एकदा त्याबद्दल समिती नेमली व 'आकाशातील अनोळखी उडत्या वस्तू 'Unidentified flying objects' किंवा थोडक्यात म्हणजे UFO या प्रकाराखाली त्यांची पुन्हा नोंदणी सुरू झाली. त्याप्रमाणे १९५२ मध्ये असे १५०० प्रकार नोंदले गेले, तर १९५७ मध्ये १००० तसे प्रकार आढळले. पुढे पुढे तर असे आढळू लागले की अशा अनोळखी वस्तु आकाशात दिसण्याच्या वेळी खाली जमिनीवर काही तरी अघटीत घडायचे.

उदाहरणार्थ १२ सप्टेंबर, १९५२ रोजी सदर शहरावर अशी एक वस्तु आकाशात दिसल्यावर ती पाहण्यासाठी जे गेले त्यांचे घसे व तोंडे सुजून बसली. ४ नोव्हेंबर, १९५७ रोजी ब्राझील मध्ये अशी अनोळखी वस्तू दिसली आणि त्या क्षणीच गावाचा वीजपुरवठा बंद पडला. काही लोकांनी तर असे नमूद केले आहे की, त्यांना पाहण्यासाठी मोटारीतून गेलात तर त्या मोटारीच बंद पडतात. काही वेळानंतर त्या मोटारी पुन्हा चालू होतात. ९ नोव्हेंबर, १९६५ रोजी न्यूयॉर्कचा वीजपुरवठा ८ तास बंद पडला होता व त्याच वेळेस आकाशात अशा अनोळखी वस्तू दृष्टीस पडल्या होत्या. अनेकवेळा असे आढळून आले आहे की, या अनोळखी वस्तू आकाशात दिसल्या रे दिसल्या की त्याच वेळी त्या गावात ब्लॅक आऊट होतो. परंतु प्रश्न असा आहे की, हे केवळ कर्मधर्मसंयोगाने घडते की काय ?

## तबकड्या येतात तरी कोठून

त्यातूनही या उडत्या तबकड्या प्रत्यक्षात खऱ्या असतील तर त्या येतात तरी कुठून ? पूर्वी असा समज होता की, त्या चंद्रगोलावरून किंवा शुक्र मंगळावरून पृथ्वीवर येत असाव्यात. परंतु आतातर खुद्द चंद्रावरच आपले अंतराळवीर अनेकदा जाऊन आले आहेत. त्याचप्रमाणे शुक्र-मंगळापर्यंत देखील आपले अग्निबाण जाऊन पोहचले आहेत. परंतु तेथे जीव वसतीची

शक्यता वाटत नाही. बरे, गुरु-शनि सारख्या दूरच्या ग्रहावर जीव वसती असण्याची शक्यता तर नसावीच तेव्हा आपल्या सूर्यग्रहमालेतील एखाद्या अन्य ग्रहावरून उडत्या तबकड्या येणे शक्य वाटत नाही.

काहींच्या मताने एखाद्या दूरच्या तारकेच्या ग्रहगोलावर आपल्याहून प्रगत असलेला मानव जर असेल तर तो ह्या उडत्या तबकड्या पृथ्वीवर पाठवीत असावा. हे एकदम कबूल. परंतु प्रत्यक्षात उडत्या तबकड्यांचा देखावा बायबलच्या पूर्वीच्या काळापासून दिसत असल्याचा पुरावा उपलब्ध आहे. म्हणजे गेली २००० वर्षे त्या दिसत असून त्या एकदाही पृथ्वीवर खाली उतरल्याचा वृत्तांत हाती मिळत नाही. पण मग प्रश्न असा पडतो की, उडत्या तबकड्या लोकांना दिसल्याचा जो देखावा दिसतो तो खोटाच का काय ? आणि सामान्य लोक एखादे वेळेस चुकीने बोलत असले तरी कॅप्टन मँटेलसारखे वैज्ञानिक त्या पाठोपाठ उगाच जातील काय ? ते तर काही शक्य नाही. शिवाय लॅबॉकचे दिवे म्हणून ज्या उडत्या तबकड्या दिसल्या त्यांचे तर प्रत्यक्ष छायाचित्रच घेतले गेले आहे; तेव्हा ते खोटे कसे काय ?

**इंद्रधनुष्याप्रमाणेच हाही एक नैसर्गिक देखावा असावा..**

आणि प्रत्यक्षात पाहिले तर उडत्या तबकड्यांचा देखावा खराच असतो. परंतु तसे पाहिले तर आकाशातील इंद्रधनुष्याचा देखावा देखील खराच असतो नाही का ? डॉ. मेंझेल नावाचे एक संशोधक आहेत त्यांनी तर लॅबॉकच्या दिव्याप्रमाणे दिसणारा देखावा प्रयोगशाळेत पडद्यावर प्रयोगाने मिळवून दाखविला. त्यांचे म्हणणे असे की, नेहमी कडक थंडीच्या दिवसात उडत्या तबकड्यांचे देखावे दिसतात. त्याचे कारण म्हणजे हवेत फार गारठा असल्याने अदृश्य असे बर्फाचे स्फटिक अधांतरी बनून त्यांचा जणूकाय पातळ पापुद्रा अधांतरी तरंगत असतो. अशा वेळी दूरच्या मोटारी किंवा विमानांच्या दिव्यांच्या प्रतिमा पडद्यावरील परावर्तनाने आकाशात उमटतात आणि त्या मोटारी किंवा विमाने पुढे जाऊ लागली की त्या प्रतिमा विलक्षण वेगाने पुढे पळतात. उडत्या तबकड्यांचा विलक्षण वेग जो दिसतो तो यामुळे दिसतो. त्याच प्रमाणे कोणतीही वस्तु ध्वनिच्या वेगाहून म्हणजे ताशी ८०० मैलाहून अधिक वेगाने हवेतून जाऊ लागली तर तिचा प्रचंड आवाज व्हायलाच पाहिजे. असे असताना उडत्या तबकड्यांचा आवाज का होत नाही ? याचे कारण म्हणजे तो नुसत्या प्रतिमांचा खेळ असतो म्हणून.

यावर कदाचित अशी पृच्छा कोणी करील की लॅबॉकचे दिवे वगैरेंच्या बाबतीत हा प्रतिमा–सिद्धांत खरा असेलही परंतु दृष्टिला दिसणारी नळकांडी व तबकड्या या कशा बनत असाव्यात ? अर्थात त्यालाही उत्तर असे आहे की, सूर्याकडून विश्वात प्रतिसेकंदाला ३०० मैल वेगाने जो सौरवारा वाहतो त्यातील वस्तुकणांना पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रा-

मुळे पृथ्वीवर उतरण्यास विरोध केला जातो. अर्थात ध्रुवप्रदेशापाशी ते बहुसंख्येने सरळ पृथ्वीवर खाली उतरतात. नित्यातून ध्रुवीय प्रकाशाचे (ऑरोरा पोलॅरिस) रंगीबेरंगी गालिचे आकाशात दिसतात. त्याचप्रमाणे ध्रुवप्रदेशाच्या खालच्या अक्षांशात देखील त्या वाऱ्यातील क्वचित एखाद दुसरे कण पृथ्वीवर अधूनमधून उतरतात नि हवेच्या अणुरेणुंशी त्यांची टक्कर होऊन त्यातून प्रकाशाचे उगम बनतात. या टकरा फार उंचावर होत असतात आणि त्या ठिकाणी ताशी १००-२०० मैल वेगाने वाहणारे वारे असल्याने या प्रकाश उगमाना तबकडीसारखे आकार किंवा चक्राकार प्राप्त होतात. अशा देखाव्यांचा भास उडत्या तबकड्या म्हणून आपल्याला होत असावा.

अर्थात सर्वच उडत्या तबकड्यांचे स्पष्टीकरण यातून होते असे नाही. परंतु त्याचबरोबर इंद्रधनुष्य. 'चंद्राभोवतालचे रंगीतवलय (खळे)' याप्रमाणेच उडत्या तबकड्या हा देखील एक नैसर्गिक देखावा असावा असे वाटते. साधारणपणे तो थंड प्रदेशात थंडीच्या दिवसात जास्त दिसतो. गेली २००० वर्षे ज्या अर्थी तो दिसतो आहे त्या अर्थी आकाशात दिसणाऱ्या निसर्ग चमत्कारातील तो एक असावा असे म्हणावयास हरकत नाही. त्याचप्रमाणे काही वेळा उंच उडणारे फुगे देखील दुरून तबकडी प्रमाणे दिसतात. या सर्व प्रकारांचे स्पष्टीकरण आज जरी देता आले नाही तरी पुढे केव्हातरी देणे ते शक्य होईल हे तितकेच खरे.

◻ ◻ ◻


# राजा शिवछत्रपती

## ब. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपये

प्रकाशक


**महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान**

सातारा

एकमेव विक्रेते

**राजहंस प्रकाशन,**

पुणे



अ. द. वेलणकर

'हे हाऽताऽऽ शरणागताऽऽऽ...'

—डॉक्टर जोशींची तान हवेत विरली. डॉक्टरांची ही नेहमीचीच पद्धत! रात्री १० वाजता दवाखाना बंद करून ते गावाबाहेरच्या आपल्या बंगल्याकडे निघाले की कारच्या सुरात सूर मिळवून ते चक्क गाऊ लागतात. ...इतक्यात

डॉक्टरांना कुणीतरी ओळखीचं दिसलं आणि त्यांनी कार थांबवली.

—'क्यू डॉक्टरसाब, क्या बात है?... आज खूष नजर आ रेहे हो!'

—'हां नाना! औरंगाबादचे आपले बाबासाहेब आले आहेत इथं. माझ्याकडंच मुक्काम आहे त्याचा उद्या बसू माझ्याकडे. त्यांचा गळा एकदम तयार झाला आहे या दोन वर्षांत. अन् ठुंबरी काय लाजबाब गातो पठ्ठा! व्वा!!'

—'उद्या सेकंड सॅटरडे...परवा रविवारच...तो फिर हो जाय...!'

—'अच्छा! ये उद्या अगदी 'सहपरिवार' हं!...'

---

# मैफल

---

कार निघाली आणि डॉक्टर पुन्हा आपल्याच तंद्रीत गाऊ लागले

डॉक्टरांचे घर. दुसऱ्या मजल्यावरचा प्रशस्त हॉल. एवढा मोठा हॉल हल्ली दुसऱ्या कुणा बंगलेवाल्याकडे दिसणं जवळ जवळ अशक्यच! नाटकाच्या तालमी आणि गाण्याच्या बैठकींना लागतो नेहमी, म्हणून या शहाण्या माणसानं तळमजला राहण्यासाठी राखून सबंध दुसऱ्या मजल्यावर हा भला मोठा हॉल राखून ठेवलाय!.. भारतीय बैठक...पानदानं. लोड...सर्वत्र सुगंधाचा दरवळ...गानशत्रूलाही गाण्याची लहर यावी असलं वातावरण. इनेगिने दर्दी लोक ही रात्र साजरी करण्यासाठी जमलेले...जव्हारीदार तानपुरे झंकारू लागले...आणि बाबासाहेबांनी निषाद लावला, तोच असा पारदर्शी की मैफलीतल्या साऱ्यांनी तिथेच पहिली दाद दिली! यमन रागाच्या समर्थ आलापांनी भारून टाकलं क्षणात वातावरण...

इतक्यात डॉक्टरांचा भाऊ वर आला आणि त्याने हलकेच त्यांच्या कानात काही सांगितले, डॉक्टरांनी जवळ बसलेल्या एका मित्राकडे पाहून 'आता येतो' म्हटलं आणि ते खाली गेले.

फोन त्यांची वाट पहात होता... डॉक्टरांनी फोन खाली ठेवला. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर कष्टीपणाचा भाव दिसला...त्यांच्या एका पेशंटला हार्ट अटॅक आला होता...गाणं की कर्तव्य? ...एका क्षणाचा पेच—लगेच त्यांनी शांतपणे आपली बॅग उचलली. त्यांची पत्नी पुढे झाली.

'नाही गेलात एवढी वेळ तर चालणार नाही का?...

एवढी मैफल सोडून...'

—डॉक्टर तिच्याकडं पाहून खिन्नपणे हसले!

'वर कॉफी पाठव तासाभरानं. मध्यंतरापर्यंत आलोच मी...'

डॉक्टरांची कार वेगानं निघाली. काहीतरी वर्णनातीत भावना अनुभवत होते ते....

पेशंट सिरियस होता. तावडतोब त्याला हॉस्पिटलमध्ये हलवणे जरूर होतं...हॉस्पिटलमध्ये फोन...धावाधाव

...आणि पेशंट सावरत होता...तो तग धरेल अशी खात्री झाल्यावर — आपल्या कर्तव्यातून डॉक्टर मोकळे झाले. त्यांना आठवलं, अरे! आपल्या घरी मैफल बसली आहे! याक्षणी आपण तिथे असायला हवंय! —डॉक्टरांची कार घराच्या दिशेनी धावू लागली. त्यांनी घड्याळ पाहिलं, तीन वाजले होते.

गाडी थांबली आणि डॉक्टरांनी एखाद्या लहान मुलाच्या चपळाईने गाडीबाहेर उडी घेतली. ते जिन्याकडे धावले. ते दोन-तीन पायऱ्या चढून गेले आणि त्यांच्या कानात टाळ्यांचा कडकडाट ऐकू आला! तानपुऱ्यांचा नाद अंतर्धान पावत होता...डॉक्टरांनी जिन्याचा कठडा गच्च धरून ठेवला. क्षणभर ते तिथेच उभे राहिले. कसेबसे हॉलमध्ये पोहचले. मंडळी उठत होती.

'बराय डॉक्टर, धन्यवाद!' 'अच्छा डॉक्टर, बराच उशीर झालाय, निघतो आता'...डॉक्टरांचा निरोप घेऊन हळूहळू लोक घरोघर निघून गेले...हॉलमध्ये आता उरले होते फक्त डॉक्टर आणि बाबासाहेब... दोघं मूकपणे समोरासमोर बसले होते...पाच-दहा मिनिटे अशीच गेली.

'चलो. चार बज रहे है. अब यहासे उठनाही होगा.'

—डॉक्टर उठून उभे राहिले. त्यांना हाताने धरून खाली बसवत बाबासाहेब म्हणाले—'बैठो यार! अभी तो अपनी मैफल शुरू हो रही है!...'

'बाबा पुरे! तू थकला आहेस. अरे आणखी काही वर्षे जगायचं आहे की नाही!'

'छोड दो डॉक्टर! हम इतने जल्दी मरनेवाले नहीं है! ये बैस इथं. आता खरं गाणं ऐक माझं!...'

बाबासाहेबांची बोटं तारांवरून फिरू लागली आणि तानपुऱ्याच्या झंकाराने त्या नीरव पहाटेला हळूहळू जाग येऊ लागली!

□ □ □



**चालू लेखमाला**

# मी नेताजींना बघितलंय् !

जबानी दुसरी : हप्ता पाचवा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

नंतरचे दोनेक महिने नेताजी सिंगापुरात नव्हते. आधी ते टोकिओला गेले. ग्रेटर ईस्ट एशियन नेशन्स कॉन्फरन्समध्ये भाग घ्यायला. निव्वळ एक प्रेक्षक म्हणून. तिथनं परतताना बँकॉकवरून अंदमान निकोबार बेटात गेले. जपानी सैन्याकडनं ह्या दोन्ही बेटांच्या शासनाची सूत्रं त्यांनी आझाद हिंद सरकारच्या वतीनं आपल्या हातात घेतली. त्रेचाळीस सालचा शेवटचा दिवस— म्हंजे ३१ डिसेंबर. त्यांनी अंदमानमध्ये

पाऊल ठेवले. दोन्ही बेटांना नवी नावं दिली गेली--स्वराज न् शहीद !

नेताजी सिंगापूरला परतले जानेवारीच्या एक तारखेला. अन् लगेच म्हणाले, 'आपली कचेरी ब्रह्मदेशात हलवू या.'

सहा जानेवारीला आम्ही हेडक्वार्टर्स रंगूनमध्ये आणलं.

नेताजी टोकिओला गेले तेव्हा त्यांच्याबरोबर भोसले, अय्यरसाहेब, आनंद मोहन सहाय न् मेजर अविद हुसेन गेले होते. अंदमानला त्यांच्याबरोबर लोकनाथन् गेले होते. मी आपला सिंगापुरातच होतो.

हे दोन महिने मला फारसं काम नसायचं. जवळपास रोजच हरगोविंदसिंगची गाठभेट व्हायची. हरगोविंदसिंग प्रचंड वेगानं बदलत चालला होता. कामात आता त्याला उत्साह राह्यला नव्हता. मनच लागायचं नाही. दारूची बाटली एकदा उघडली ती आता त्याला हातावेगळी करता येत नव्हती. ज्या पोरानं आतापर्यंत कधी हार मानली नाही, त्याला ब्रिजलाल जयस्वालनी पुरतं हरवून टाकलं होतं. अखेरशेवटी हरगोविंदसिंग ह्या द्वंद्वातून आपण होऊनच बाजूला झाला होता.

दरम्यान हरगोविंदसिंगच्याकडे कामाला असलेल्या दोनचार माणसाशीपण ओळख झाली होती माझी. मी एकटा दिसलो की काकुळतीनं ते म्हणायाचे--धंदा डबघाईला आलाय्. सरदारजी जातीनं कशातच लक्ष घालत नाहीत सध्या.

मधनंमधनं मोका मिळाला की मी पण हरगोविंदसिंगला सांगायचो--असं का स्वतःचा सत्यानाश करताय् तुम्ही?

हरगोविंदसिंग फिकट हंसायचा. त्याचं ते सातमजली हंसणंपण आता नाहीसं झाले होतं.

म्हणायचा--तू बघूनच घे भाईसाब, ह्या ब्रिजलालला चांगला धडा शिकवणाराय् मी एक दिवस! बदला घेणाराय् मी! पैसा म्हंजेच सगळं काही नाही ह्या दुनियेत!

हा निव्वळ दुबळ्या माणसाचा वांझोटा आक्रोश आहे हे समजत होतं मला.

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात जेव्हा आम्ही सिंगापूर सोडून रंगूनला जायला निघालो, तेव्हा आम्हाला पोचवायला आला होता हरगोविंदसिंग.

त्याचा हात हातात घेऊन मी म्हणालो--आता परत आपला भेटपण व्हायची नाही कदाचित्!

तो म्हणाला--असं काय बोलतोस भास्करनभाई ! का म्हणुन भेट होणार नाही ? सिंगापूरचा बाडबिस्तरा गुंडाळून नव्यानं रंगूनला धंदा उघडायचं ठरवलय् मी ! '

--का ? ब्रिजलालजी हाकलतायत इथनं ?

हरगोविंदसिंगनं जोरजोरात मान हलवली.

म्हणाला--ब्रिजलालजींचा धंदा रंगूनमधंपण आहेच की! तेव्हा ब्रिजलालजींचं काही विशेष नाही. त्यांच्यामुळं म्हणून काही मी सिंगापूर सोडतोय् असं नाही. मी आपला तुमच्या मागे मागे येणाराय्! तुम्ही जाल तिथं धंदा खोलेन! एकदिवस चक्क कलकत्यात!

तिथनं दिल्ली! मग अमृतसर! आतातर मी महिन्याभरातच रंगूनला येईन बहुतेक !

पण महिनादेखील लागला नाही. पंधरा दिवसातच हरगोविंदसिंग आपला एकदिवस रंगूनला हजर!

म्हणाला—सिंगापूरचं सगळं फुंकून टाकायचं पक्कं केलंय् इथं जमीन बघायला म्हणून आलोय् !

ह्याच सुमाराला हरगोविंदसिंगच्या आयुष्यात एक प्रचंड बदल घडून आला. माझ्या डोळ्यासमोरच ती घटना घडली. त्याच्या आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी मला माहीत झाल्या होत्या, तरी त्यादिवशी तो का म्हणून असं वेडयासारखं वागला—मलातरी काही उमजत नाही अजुनी.

हरगोविंदसिंग भलताच भावना प्रधान होता ह्यात शंकाच नाही. नाही तर असं निव्वळ एका शब्दावर बापाचं घर सोडून त्याने समुद्रात स्वतःला झोकून दिलंच नसते. व्रिजलालजीच्यावर त्याचा भयंकर राग पण होता. सर्वांच्यासमोर आपल्याला व्रिजालाल-जींचा पराभव करता आला ह्या आनंदानंच तो मातला होता बहुतेक त्या दिवशी पण निव्वळ एवढयानेच त्याच्या त्या अजब वागण्याचा काय खुलासा होणार! कोणजाणे. मलातरी काही कळलं नाही. आता काय झाले तेच मी तपशीलवार सांगतो. मग तुम्हीच बघा काही थांग लागतो का ते.

तारीख लक्षांत आहे माझ्या १९४४ साल. २६ जानेवारी स्वातंत्र्यदिन रंगूनच्या म्युनिसिपल बिल्डिंगसमोरच्या मैदानात प्रचंड सभा भरली होती. नेताजींना ब्रह्मदेशात आल्याला वीसकै दिवस झाले होते. ब्रह्मदेशांतले हे त्याचं पाहिलं जाहीर भाषण होतं. शहरांतले सगळे मोठेमोठे लोक सभेला हजर होते. भयंकर गर्दी किमान साठकै हजार लोक तरी असतील.

सुरुवातीलाच ब्रह्मदेशाच्या रहिवाशांच्यातर्फे नेताजींना एक भला थोरला हार घातला गेला. गुलाब न् चंद्र-मल्लिका सबंध सभेत आरोळी उठली— नेताजी झिंदाबाद! आझाद हिंद झिंदाबाद! जयहिंद !

नेताजींनी हार काढून आपल्या खुर्चीवर ठेवला. अन् ते माइककडे आले.

रंगूनची माणसं आतापर्यंत नेताजीच्याबद्दल निव्वळ ऐकत आले होते. आपल्या आवडत्या नेत्याला आज स्वतःच्या डोळयांनी बघायला लोक उत्सुक होते. लोकांची ही गर्दी. व्यासपीठावर आझाद हिंद सरकारचे न् आझाद हिंद सेनेचे मुख्य–मुख्य लोक बसलेले. अन् ब्रह्मदेशांतली मुख्य मंडळी पहिल्या रांगेत सरकारी न् विनसरकारी खास पाहुणे बसले होते. समोरच्या गादीवाल्या खुर्च्यांवर मोठमोठे भारतीय व्यापारी बसलेले, बँकॉक–सिंगापूर–रंगूनचे प्रख्यात उद्योगपती न् बलाढय व्यापारी–हबीबभाई, करीम, गनी, आदमजी.

सभेला सुरुवात व्हायच्या किंचित् आधी किडकिडीत व्रिजलाल जयस्वा-

लपण आलेले पाहचले. काळ्या रंगाचा लाँगकोट होता त्यांच्या अंगावर. डोक्यावर नक्षीकाम केलेली टोपी. हातांत हस्तीदंती मुठीची काठी. त्यांच्याबरोबर वडलांचा हात धरून सुभद्रा जयस्वाल म्हंजे ब्रिजलालजी मुलीला घेऊन सिंगापूरहून रंगूनला आले होते. आणखी चारजणांच्याबरोबर मीपण येणाऱ्या पाहुण्यांच्या आगत– स्वागतात गुंतून पडलो होतो. त्यांना दोघांनाही मी पुढल्या रांगेत नेऊन बसवलं. सुभद्रेनं ओळखलं मला. नमस्कार केला. चांगली चिटुकली आहे की ! हसली की मोती झरतात तोडांतनं !

नेताजीचं भाषण सुरू झालं. सभेत सुई पडली तरी कळेल इतकी शांतता होती.

नेताजी त्यादिवशी बोलले रंगूनच्या लोकांच्यासमोर पण हलके हलके पूर्व– आशियांतल्या सगळ्या भारतीय लोकांना उद्देशून त्यांनी आपलं म्हणणं मांडलं.

नेताजी दोन तास बोलले त्यादिवशी. त्यांच्या भाषणानं श्रोत्यामध्ये आग पेटली. हजारों माणसांच्या हृदयांत रक्त उंचबळून उठलं !

भाषण सपल्या-संपल्या सगळ्यांनी एकसाथ गर्जना केली–जयहिंद ! नेताजी झिंदाबाद !

नेमकं ह्याचवेळी आपल्या अवाढव्य शरीरानं मागच्या गर्दीतनं वाट काढत हरगोविंदसिंग पुढं आला.

त्याच्या कपड्यात आता पूर्वीचा भपका नव्हता. सबंध माणूसच कसा मरगळून गेल्यासारखा झाला होता.

मी त्याला दिसलो नाही. ब्रिजलालजी दिसले. हात जोडून त्यान ब्रिजलालजींना 'नमस्ते' केलं.

ब्रिजलालजींनी त्याला बघूनही न बघितल्यासारखं केलं न् तोंड फिरवून घेतलं.

शेजारनं सुभद्रेनं उलट नमस्कार केला.

––नमस्ते ! बैठिये ना जी !

शेजारची खुर्ची तिने दाखवली. ब्रिजलालजींनी मान फिरवून पाह्यलं. त्यांच्या भिवया वर गेल्या.

सुभद्रेच्या शेजारच्याच खुर्चीवर बसावं का काय असा पेच हरगोविंदसिंगला पडला एवढ्यात माइकवर परत नेताजींचा आवाज आला. सगळ्यांच्या नजरा तिकडे वळल्या. हरगोविंदसिंग अजून उभाच होता.

भाषण संपवून नेताजी आपल्या खुर्चीकडे गेले, तर तिथं प्रचंड हार ! त्यांनी भाषणाच्या आधी ठेवलेला. तो हार त्यांनी उचलला क्षणभर विचार केला अन ते परत माइकसमोर आले. सगळ्यांना उद्देशून म्हणाले —

भाइयों और दोस्तों !

हा हार तुम्ही आज मला दिलायत. दोनच दिवसात ह्यातली फुलं सुकून जातील. त्या दृष्टीनं ह्या हाराला किंमत नाही. पण तरी हा हार म्हंजे सबंध ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या, स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगणाऱ्या भारतीयांच्या शुभेच्छेचं प्रतीक आहे. त्या दृष्टीनं हा हार लाखमोलाचा आहे. मी

ह्या हाराचा लिलाव पुकारणाराय्. ह्याचे जे काही पैसे येतील त्या रकमेनं इथला आझाद हिंद फंड उघडण्यात येईल. सबंध पूर्व-आशियांतली कुबेर-मंडळी इथं हजर आहेत. बोला, हा हार केवढ्याला घ्यायला तुम्ही तयार आहांत ?

ती साठ हजार माणसं दहाएक सेकंद गप्पच राहृयली.

ती शांतता मोडून टाकणारा पहिला आवाज आला तो हरगोविंदसिंगचा !

मैं खरीदूंगा नेताजी ! एक लाख डॉलर !

सभेनं परत एकदा 'नेताजी झिंदा-बाद' म्हणून गर्जना केली.

हरगोविंदसिंग व्यासपीठाकडे यायला निघाला.

अचानक उठून उभे राहृयले ब्रिज-लालजी !

गंभीर आवाजात मागनं हरगोविंद-सिंगला उद्देशून म्हणाले —— ठहरिये !

मग नेताजींच्याकडे वळून म्हणाले — मैं खरीदूंगा ! दो लाख डॉलर !

हरगोविंदसिंग जागच्याजागी खिळून राहृयला. घायाळ झाल्यासारखं तो इकडेतिकडे बघायला लागला. त्यानं काही बोलायच्या आतच पलीकडनं आणखी एक व्यापारी उठून उभा राहृयला. तो बँकॉकहून आलेला होता. म्हणाला —— ढाई लाख !

— पूरा तीन लाख !

तावडतोब ब्रिजलालजींनी जबाब दिला.

बँकॉकचा व्यापारी पण हरणाऱ्या-तला नव्हता.

म्हणाला – तीन लाख दहा हजार !

आत्ता कुठं हरगोविंदसिंग सुभद्रेच्या शेजारच्या खुर्चीवर बसला. तो भयंकर बेचैन होऊन गेला होता. गळ्यातल्या टायची गाठ त्यानं बोटं घालून ढिली केली. खिशातनं रुमाल काढून तोंड पुसलं.

सुभद्रा खालच्या आवाजात म्हणाली काहीतरी त्याला. ते ऐकू आलं नाही हरगोविंदसिंगला. तो आपल्याच तंद्रीत होता. त्याच्या मनात जणू प्रचंड द्वंद्व चाललं होतं. अन् त्या द्वंद्वांत त्याच्या हृदयाच्या चिंधड्याचिंधड्या उडत होत्या. एकदम त्यानं मान वर केली ती ब्रिजलालजींच्या आवाजानं.

—— सव्वातीन लाख !

बँकॉकवाल्या इसमानं जरा दम खाल्ला. मग त्यानं पुकार केला—— साडेतीन !

——तीन लाख साठ हजार !

——तीन लाख सत्तर !

ब्रिजलालजीपण हट्टाला पेटले.

——तब चार लाख !

विजेचा धक्का बसल्यासारखी हरगोविंदसिंग ताड्कन् उभा राह्यला ! न् जोरात ओरडला——पाच लाख डॉलर !

का कुणास ठाऊक, पण सभेतल्या सगळ्यांचाच हरगोविंदसिंगला पाठिंबा होता. त्यानं पाच लाखाचा पुकारा केला. तशी सबंध सभेनं मोठ्या आनंदानं आरोळी ठोकली.

ब्रिजलालजींनी ह्या राक्षसासारख्या

प्रचंड इसमाकडे एक कटाक्ष टाकला. त्यांच्या नजरेत जनावरासारखी चीड होती. पायापासनं डोक्यापर्यंत हरगोविंदसिंगला त्यांनी एकदा बघून घेतलं.

मग दातओठ खात म्हणाले––तब पाच लाख एक हजार!

हरगोविंदसिंगनं दोन्ही हात वर फेकले. हवेत. अन् तो धप्‌दिशी खुर्चीवर कोसळला.

बँकॉकवाला व्यापारी मात्र तेवढ्यावर थांबला नाही.

म्हणाला––सव्वापाच!

हरगोविंदसिंग लिलावातनं बाजूला झाला. दोन्ही हातानी तोंड झाकून तो बसून राह्यला.

आता दोन कुबेरांचं द्वंद्वयुद्ध सुरू झालं. ब्रिजलाल जयस्वाल न् बँकॉकचा व्यापारी.

दहादहा हजारानं भाव चढत चालला. हरगोविंदसिंगच्या आवाक्याबाहेर.

वाढता-वाढता रक्कम सात लाखाला टेकली. शेवटची बोली ब्रिजलालजींनी केली. ब्रिजलाल जयस्वाल! सिंगापूरचा धनाढ्य चेट्टियार!

बँकॉकचा व्यापारी आता बोली पुढं नेईना.

हार हातात घेऊन नेताजी उभे होते!

नाही! आणखी कुणी बोली केली नाही! हीच शेवटची बोली! सात लाख डॉलर!

जिंकलेल्या वीराप्रमाणे खुर्चीवरनं उठून किडकिडीत ब्रिजलाल चेट्टियार व्यासपीठाकडे निघाले. हार हातात घेऊन नेताजी व्यासपीठाच्या त्या टोकापासनं इकडे यायला निघाले.

इतक्यात अचानक सरदार हरगोविंदसिंग झटकन् उठून उभा राहचला. जखमी झालेल्या हत्तीसारखा हुंकार देत!

दुखावलेल्या आवाजात त्यानं आर्त हाक दिली! नेताजी!

सभेतले सगळेजणच उठून उभे राहचले! हजारो माणसं! पण आवाज नाही! सगळे गप्प!

ब्रिजलाल जयस्वाल थबकले. त्यांनी मागं वळून बघितलं. तर समोर हा राक्षसासारखा प्रचंड सरदारजी!

ब्रिजलालजी कधी हसायचे नाहीत. त्यांना हे सोंगं यायचंच नाही. पण आज ते हसले! छद्मीपणानं हसले! सैतानासारखं हसले.

म्हणाले––'नेताजी' पुकारने से क्या फायदा सरदारजी? आगे भाव बढाने की हिम्मत है तो बढते चलो! बढाओगे और?

हरगोविंदसिंगचे दोन्ही डोळे लक्कन् पेटून उठले. खून करणाऱ्या माणसाचे डोळे जसे होत असतील ना खून करायच्या आधीच्या क्षणी––तसे!

दातओठ खात तो म्हणाला––आपके साथ कोई सवाल नही! मैं नेताजी को कुछ कहना चाहता हूँ!

ब्रिजलालजी गालातल्या-गालात हंसले.


नेताजी के साथ कोई सवाल नही! सवाल जो था वह तो सब खतम कर चुका यह जयस्वाल!

| | | |
|---|---|---|
| माणूस | | स्पर्धा |
| रंगतरंग | | क्रमांक |
| स्पर्धा | वसंत सरवटे | दहा |

ही स्पर्धा मुलांसाठी आहे तशीच वडील मंडळींसाठीही.

स्पर्धा अ.

किती राक्षस ?



वरील चित्र पहा. हे कोणाचे आहे ? राक्षसाचे तर नव्हे ? होय ! राक्षसाचेच ! पण या चित्रात एकूण किती राक्षस दडून बसलेत सांगा पाहू.

उत्तर

## स्पर्धा ब.

खालील प्रश्नांची तुम्हाला योग्य वाटतील ती उत्तरे द्या.

१. लांब नाक असणाऱ्या माणसांना भोवतालच्या जगाविषयी कुतहूल असते असं म्हटलं तर चपट्या नाकाच्या माणसाला पाहून तुम्ही काय म्हणाल ?

२. ज्याच्या सुरुवातीला व शेवटी एकच अक्षर आहे पण ज्याच्यामध्ये हजारो शब्द आहेत असे काय ?

३. मी जगातली कोणतीही भाषा बोलू शकतो. तर मी कोण ?

४. स्वत: काळीकुट्ट असूनसुद्धा जगातील सौंदर्याचा साक्षात्कार घडवून आणते अशी कोण ?

५. हात आहेत, पाय आहेत, पण हालता येत नाही चालता येत नाही तर मी कोण ?

## उत्तरे

१.

२.

३.

४.

५.

## स्पर्धा क. गणपतरावांची फजिती



गणपतरावांनी ४ कपाची म्हणून नवी किटली विकत आणली. नवा टी सेटही घेतला. पान-वरील चित्र पहा. त्याच्या उद्घाटनासाठी आपल्या तीन मित्रांना चहाला बोलावले.

गणपतरावांच्या पत्नीने नव्या किटलीतून चहा आणून टेबलावर ठेवला अन् त्याबरोबर नवा टी-सेट-चार कपांचा.

गणपतरावांनी रास्त अभिमानाने कपात चहा ओतायला सुरुवात केली. आणि ?

...आणि त्यांना एकदम गोंधळल्यासारखे झाले. एवढ्या थाटाने बोलविलेल्या तीन मित्रांसमोर मान खाली घालायची पाळी गणपतरावांवर आली.

—म्हणजे नक्की काय झाले सांगू शकाल तुम्ही ? जास्तीत जास्त ४ वाक्यात.

उत्तर

## स्पर्धा ङ.

रामजी व गंगाराम यांच्या बागा शेजारी शेजारी. दोघांच्याही बागातून दररोज १२-१२ आंबे निघायचे. दोघेही दररोज बाजारात जाऊन आपआपल्या बागेतले १२ आंबे विकायचे. रामजीचे आंबे कलमी म्हणून तो ते एक रुपयाला २ ह्या भावाने विकायचा, तर गंगाराम आपले रायवळ आंबे एक रुपायाला ४ ह्या भावाने.

एक दिवस रामजी आजारी पडला. तेव्हा त्याने गंगारामला आपले आंबे बाजारात नेऊन नेहमीप्रमाणे रुपयाला दोन ह्या भावाने विकायला सांगितले. गंगारामने कबूल केले.

संध्याकाळी गंगाराम आंबे विकून परत आला अन् रामजीला म्हणाला, 'तुझे आंबे रुपयाला दोन न् माझे रुपयाला चार म्हणजे दोन रुपयाला एकूण आंबे सहा. तुझे न् माझे मिळून एकूण २४ आंबे विकून आठ रुपये मिळाले. पैकी माझ्या १२ आंब्याचे मला दररोज येणारे ३ रुपये मी काढून घेतो. आणि उरलेले ५ रु. तुझे तू घे.

रामजी म्हणाला, 'माझ्या १२ आंब्याचे मला दररोज ६ रुपये येतात. तेव्हा तू माझा एक रुपाया द्यायचा बाकी आहेस तो देऊन टाक."

गंगाराम म्हणाला, 'मी तुला सांगितलेल्या हिशेबाप्रमाणे तुझे ५ रु. च होतात; तर तुझा एक रुपया आणखी कोणता ?'

तुम्हाला कोणाचे बरोबर वाटते ? गंगाराम लबाड आहे ?

उत्तर चार पाच वाक्यांत हवे

उत्तर

---

स्पर्धकाचे नाव, पत्ता आणि वय

---

माणूस साप्ताहिक : २१ ऑक्टोबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

नेताजीच मध्ये पडले. नेताजींनीच त्यांची बाचाबाची थांबवली.

म्हणाले—ठीक आहे, हरगोविंदसिंग तुला काय म्हणायचंय् ?

हरगोविंदसिंग व्यासपीठाकडे गेला. आवेगानं त्याचं प्रचंड शरीर थरथरत होतं. पण आपलं म्हणणं मात्र त्यानं अगदी स्वच्छपणानं मांडलं. त्याचा आवाज एवढासुद्धा कापत नव्हता. त्याचं म्हणणं सबंध सभेला ऐकू गेलं.

तो म्हणाला—नेताजी! सिंगापूरमध्ये माझी दोन घरं आहेत. गॅरेजमध्ये आठ ट्रक आहेत. बँकेतपण काही नाही तरी तीनचार लाख डॉलर आहेत. माझी सगळी मालमत्ता एकत्र केली तर सात लाख डॉलरच्यावर जाईल का नाही ते मला माहीत नाही! पण ह्या लिलावातली माझी शेवटची बोली—ह्या जगाच्या पाठीवर कुठंही माझं जे काही असेल—अगदी शेवटची कपर्दिकदेखील—ते सगळं मी आझाद हिंद फंडात देतो!—फक्त हा...हा हार तेवढा मला द्या!

सबंध सभेला आश्चर्याचा धक्काच बसला. एवढंच काय पण व्रिजलालजींना पण काय बोलावं ते सुचेना.

नेताजी व्यासपीठावरनं खाली उतरले. त्यांनी कडकडून मिठी मारली हरगोविंदसिंगला.

म्हणाले—आज तुम हि बन गया 'सरदार'! यह सवाल का कोई जवाब नही !

नेताजी हातातला हार हरगोविंदसिंगच्या गळ्यात घालायला लागले.

—नाही-नाही!

हरगोविंदसिंग किंचाळलाच!

—मला पाप लागेल नेताजी! तुमच्या गळ्यातला हार मी माझ्या गळ्यात कसा घालीन! माझ्या हातात द्या तो!

त्यानं दोन्ही हातांनी हार घेतला. न् घट्ट छातीशी धरला. हरगोविंदसिंगच्या गोळ्यातनं आसवांच्या धारा लागल्या होत्या डोळ्यातलं पाणी थेंब थेंब थेंब-थेंब गालावरनं दाढीच्या केसावरनं खाली ओघळून पडत होतं. त्या हारावर तो गाल घासत होता.

आत्ताशी कुठं धनकुबरे व्रिजलाल जयस्वाल भानावर आले.

म्हणाले—लेकीन नेताजी...

—बस्! खूब!

नेताजींनी त्यांना मधेच थांबवलं.

ते हसून म्हणाले—एका शेठजीबरोबर दुसऱ्या शेठजीची लढाई होऊ शकते व्रिजलालजी! पण सरदार हरगोविंद-आज तुमच्या आवाक्याच्या बाहेर निघून गेलाय्! देखो ना भाई! वह तो बिल्कुल नंगा फकीर बन चुका! त्याच्याशी आता तुमची लढाई नाही होऊ शकत! पैशान भिकाऱ्याला डिवचता येत नाही व्रिजलालजी! फकीराला चांदीचा जूता मारणाऱ्याला 'शेठ' नाही म्हणत, 'शठ' म्हणतात !

धनकुबरे व्रिजलाल चेट्टियारनी मान खाली घातली. पैशाच्या लढाईत आज त्यांची हार झाली!

आता कुठं हारगोविंदसिंगनं मान वर उचलली.

म्हणाला—आणखी एक भिक्षा आहे नेताजी!

—बोल सरदारजी!

—आता मला राह्यला जागा राह्यली नाही नेताजी! झाडाखाली राहता येईल! शिवाय दिवसाकाठी मूठभर गहूपण हवेतच की पोटाला! तेही आता राह्यले नाहीत! तेव्हा—तुम्हीच मला आसरा द्या नेताजी! आझाद हिंद सेनेत भरती करून घ्या मला!

परत त्याला कडकडून मिठी मारली सरसेनापतींनी!

नंतर बरोब्बर चौदा दिवसानंतर म्हंजे नऊ फेब्रुवारीला आझाद हिंद सेनेची पहिली तुकडी म्हंजे सुभाष ब्रिग्रेड रंगून सोडून आराकान फ्रंटकडे निघून गेली.

त्याच दिवशी आणखी एक आगगाडी पण आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना घेऊन रंगूनहून निघाली. ट्रेनिंग कँपकडे दुसरं ब्रिगेड बनवायच होतं.

हरगोविंदसिंग ह्या दुसऱ्या गाडीत होता.

पहिल्या तुकडीला उद्देशून नेताजी म्हणाले होते--

—सर्वत्र जग आज आराकानच्या रणांगणाकडे नजर लावून आहे. तिथं आज नवा इतिहास लिहिला जाणार आहे. ह्या इतिहासाच्या पोटात फार लांब पल्ल्याची शक्यता मामावलेली आहे. ह्या रणांगणावर आझाद हिंद सेनेने न् इंपिरियल निप्पन आर्मीनं हात-मिळवणी करून इंडो-अमेरिकन सैन्याच्या प्रतिहल्ल्याची शक्यताच मुळापासनं उखडून टाकली आहे. मला पक्का विश्वास आहे, की आमचे मित्र आराकानच्या रणांगणावर वीरत्वाची जी छाप पाडून जातील, त्याच्यामुळं सबंध आझाद हिंद सेनेच्या जवानांना न् अधिकाऱ्यांना संजीवनीच मिळणार आहे. ज्या मोहिमेची आपण सगळेजण वाट बघत होतो, ती दिल्ली मोहीम आता सुरू झाली आहे. दृढ संकल्पानं आपण आगेकूच करू या. आगेकूच करतच राहू या. हा तिरंगी झेंडा--आराकानच्या पर्वतमालिकेवर आज फडकणारा हा तिरंगी झेंडा--दिल्लीला व्हाइसरॉयच्या प्रासादाच्या वर नेऊन लावेपर्यंत! आगेकूच करतच राहू या, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर आपल्या विजयाचा सोहळा होईपर्यंत!

कॉम्रेड्स! भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामातल्या सैनिकांनो आणि अधिकाऱ्यांनो! तुमच्या हृदयात आज फक्त संकल्प दृढ होऊन असू दे-- 'एक तर स्वातंत्र्य, नाही तर मृत्यू!' तुमच्या जिभेवर एकच मंत्र असू दे-- 'चलो दिल्ली!' दिल्लीची वाट हीच स्वातंत्र्याची वाट आहे! ह्याच वाटेनं आपण पुढं जाणार आहोत! अखेर विजय आपलाच आहे!

इन्किलाब झिंदाबाद! आझाद हिंद झिंदाबाद!

९-२-१९४४ —सुभाषचंद्र बोस

नेताजी स्वत: आपल्या मिंग्लाडोनच्या हेडक्वार्टर्सहून रंगून स्टेशनवर आले होते, ह्या तुकडीला निरोप द्यायला.

मीपण स्टेशनवर हजर होतो. खरं म्हंजे सबंध्र रंगून शहरच जमा झालं होतं स्टेशनवर त्यादिवशी.

इथं हरगोविंदसिंग भेटला. ती त्याची न् माझी शेवटची भेट. नंतर त्याची काही बातमी लागली नाही. ह्या अत्यंत पराक्रमी सैनिकानं लढून-लढून दमून जाऊनदेखील भारताच्या स्वातंत्र्याची स्वप्नं बघत आराकानच्या फ्रंटवरच शेवटचा श्वास सोडला का काय कोण जाणे.

सुभद्रा जयस्वाल मात्र नंतरपण दिसली होती. रंगूनहून पायीपायी मौलमीनला यायच्या वेळेला. राणीवाहिनीच्या मुलीं'त तीच सगळ्यात सुंदर होती. कुणाच्याही नजरेत भरण्याइतकी. तिनंपण ओळखलं होतं मला. अर्धपोटी किंवा उपाशीपोटी तिनं दिवस काढले होते भर रणांगणावर. तरी ह्या वर्षात तिचं रूप जणू आणखीच फुलून निघालं होतं. शिवाय आणखीपण बदल झाला होता तिच्यात. रँकनं ती आता लान्सनायक झाली होती. अन् मी एक बघितलं, सगळे तिला 'भाभीजी' म्हणत होते. हरगोविंदसिंगनं लग्न नक्कीच केलं नव्हतं. कारण नाहीतर मला कळलं असतंच की. त्याच्यामुळं संकोचानं मला तिला विचारतापण आलं नाही, की सरदार हरगोविंदसिंगची काही बातमी तुला तरी आहे का म्हणून !

तर रंगून स्टेशनवर त्या दिवशी हरगोविंदसिंगची शेवटची गाठ पडली. नऊ फेब्रुवारीला. फलाटावर गेल्यावर त्याला विशेष शोधावंविधावं लागलंच नाही. पगडी गुंडाळलेलं त्याचं डोकं सगळ्यांच्या वर सहज दिसत होतं. लांबनंच त्यानं मला पाह्यलं न् राक्षसासारख्या लांबलांब ढांगा टाकत तो माझ्याकडे आला.

आज त्याच्या अंगावर लष्करी पोशाख होता.

दरम्यानच्या काळात त्यानं आपल्या स्थावरजंगम सगळ्या मिळकतीची सगळी मालकी आझाद हिंदच्या नेताजी फंडाला देऊन टाकली होती. रीतसर कागदपत्र करून. कागदपत्रात सगळ्या मिळकतीची किंमत सात लाख ब्याऐंशी हजार डॉलर म्हणून लिहिलेली होती.

हरगोविंदसिंगच्या पाठीवर एक प्रचंड बोचकं होतं. डाव्या हातात रायफल होती. अन् उजव्या हातात सुकून गेलेल्या फुलांचा एक प्रचंड हार होता.

मला लांबूनच म्हणाला——जयहिंद भास्करनजी ! चाललो देशाला !

——देशाला ? तू तर लढाईवर जातोयस ना ?

——अरे, तू काय कायमच असा बुद्धू राहणार का रे ? लढाई करत–करतच कोहिमा–इंफाळवरनं आम्ही अखेर–शेवटी कलकत्त्याला निघून जाणार. तिथं पिताजी न् अम्माजी आहेत. मग तिथनं दिल्ली ! मग अमृतसर !

——ते खरं आहे रे ! पण म्हणून हा हार कायम रणांगणातपण जवळ बाळगून काय होणाराय् ?

——त्याचापण विचार केला मी ! पण ठेवून तरी कुणाकडे जाणार ? तुझ्याजवळ राहू दे का ?

मी श्याल्याचं सोंग केलं.

—बापरे! हा हार बाबा सात लाख ब्याऐंशी हजार डॉलरचा आहे! आपनी काही ताकद नाही बाबा हा हार जवळ बाळगायची!

खो-खो हसला हरगोविंदसिंग. त्याचं सबंध अंग गदगदा हललं.

मला खूप बरं वाटलं त्याचं ते सात मजली हसणं ऐकून. आज तीन महिने झाले असं हसताना कधी ऐकलं नव्हतं त्याला!

इतक्यात फलाटाच्या गर्दीतनं वाट काढत काढत एक मुलगी पुढं आली. झाशीच्या राणीच्या तुकडीतली होती ती. आमच्यासमोर आल्यावर थांबली ती. माझ्याकडं बघूनही न बघितल्यासारखं केलं तिनं सरदारजीच्यासमोर उभं राहून तिनं लष्करी सॅल्यूट ठोकला त्याला. अन् ती हसली. जग जिंकल्यासारखी हसली!

मला आश्चर्यच वाटलं! अरेच्या! हे काय? ही तर सुभद्रा जयस्वाल!

हरगोविंदसिंगच्या चेहऱ्यावरचं हसूपण मावळलं!

आश्चर्यानं तो म्हणाला—आप!

—'आप' नहीं सरदारजी, कहिये की 'तुम्.' अब तो मैं तुम्हारी कॉम्रेड बन गयी!

—तू! तू राणीवाहिनीत आलीस! अन् तुझे वडील? ब्रिजलालजी?

—सरदारजी, तू तरी कुठं विचार केला होतास आपल्या आईवडलांचा! सगळं फुंकून टाकायच्याआधी केला होतास विचार तू तरी?

हरगोविंदसिंगाला काय बोलावं काही सुचेना. माझ्या लक्षात आलं, आपण इथं उगाउगाच आहोत आता! मी एकेक पाऊल मागं सरत गेलो.

हरगोविंदसिंगनं विचारलं—तूपण ह्याच गाडीनं जातेय्स का?

—मी? नाही! आम्ही तूर्त तरी रंगूनमधेच राहणार आहोत. इथंच ट्रेनिंग घ्यावं लागेल आम्हांला!

—मग तर बरंच झालं की! हे ठेव एवढं! तुलाच देऊन टाकतो!

सुभद्रेनं काही हरकत घेतली नाही. तिचं पहिलंच प्रेम होतं ते! त्याच्याकडनं पहिलीच भेट होती ती! दोन्ही हातांनी तिनं ती भेट घेतली. पैशाच्या आकड्यानं मिळण्याजोगी चीज नाही ही—असं नेताजी म्हणाले होते अनमोल होती ती भेट! नंग्या फकिराचं दान! सुकून गेलेल्या फुलांचा प्रचंड हार!

ट्रेन आता सुटायला आली होती. सुभद्रेचा निरोप घेतला हरगोविंदसिंगनं. तिचा खोपा हातात घेतला त्यानं. हारातनं एक सुकलेला गुलाब काढून तिच्या कानात खोवला. सुभद्रेचे डोळे पाण्यानं भरून आले. हातानं डोळे पुसायला देखील लाजत होती बहुतेक ती! पण त्याच्यामुळं तिच्या काजळकाळ्या डोळ्यात मोती तरळल्यासारखं दिसत होतं.

इतक्यात हरगोविंदसिंगची नजर माझ्यावर पडली.

माझं डोकं स्वतःकडे ओढून घेऊन माझ्या कानात म्हणाला—तिच्याकडे बघ जरा!

मी हसलो.

म्हणालो--मी काय बघणार ! मला काय डोळे आहेत का काय !

--का ? काय झालं तुझ्या डोळ्यांना !

--न जाने मैं अंधा हो गया हूँ !

परत फलाट हादरवून सोडणारं हसू हसला सरदार हरगोविंदसिंग.

ट्रेन सुटली.

आकाश थरकवून सोडणारी फौजी पुकार उठली ! चलो दिल्ली ! जयहिंद !

खिडकीतनं पगडीसकट डोकं बाहेर काढून बसला होता हरगोविंदसिंग. रुमालासकट त्याचा हात हलत होता. आम्ही उभे होतो रंगूनच्या फलाटावर. सुभद्रा जयस्वाल उभी होती दोन्ही हातांनी तो प्रचंड हार छातीशी धरून !

सरदार हरगोविंदसिंगची काही खबर मिळाली नाही नंतर. माझ्या ओळखीच्या जगाच्या चौकटीत अशी कितीतरी माणसं आली होती एके-काळी ! नंतर ती निघून गेली विस्तीर्ण रणांगणाच्या दुसऱ्या टोकाला. त्यांची माहिती कुणी ठेवलीय् ?

□

## जबानी दुसरी : हप्ता सहावा

पण खरं म्हंजे मी काहीतरी दुसरंच सांगत होतो ना ?

हां ! शेवटच्या आठवड्यात काय झालं ते सांगत होतो. दहा ऑगस्ट ते सोळा ऑगस्ट. रंगूनहून माघार घेतल्या-नंतरची गोष्ट.

रंगूनहून निघाल्यावर आम्ही सगळे मौलमीनला येऊन पोचलो एकदाचे. मर्तवान उपसागराच्या किनाऱ्यावर. तारीख होती ५ मे १९४५ ! दुसऱ्याच दिवशी रेल-मोटरनं नेताजी बँकॉककडे रवाना झाले.

रंगूनहून मौलमीनला मात्र जवळ-पास पायीच याव लागलं होतं. प्रचंड त्रास झाला होता सगळ्यांनाच. मौलमीन गाठल्यावर मग एवढा त्रास झाला नाही. जपाननं आमच्याकरता एका आग-गाडीची व्यवस्था केली होती. थुंबुसाया, खान्राकोएन, नोमप्लादक वगैरे पार करून आम्ही बँकॉकला पोचलो मे महि-न्याच्या पंधरा तारखेला.

बँकॉकला नेताजी उतरले सेवकराम माहथानींच्या घरी.सेवकरामजी बँकॉकचे प्रतिष्ठित उद्योगपती होते. पण निव्वळ एवढीच काही त्यांची ओळख पुरेशी नाही. ते इंडिया इंडिपेंडन्स लीगचे अर्थसचिव होते. आपलं राहतं घर नेताजींच्याकरता मोकळं करून ते स्वत: समोरच्या बंगलीत गेले होते. आम्हाला

आसरा देणारे ते एकटेच नव्हते. बँकॉकच्या बऱ्याच मंडळींनी तेव्हा आम्हाला आसरा दिला होता. नेताजींच्या हेडक्वार्टर्सला लागूनच असलेल्या इमारतीत आमची सोय झाली होती. पंडित रघुनाथशास्त्रींनी आपलं घर आमच्याकरता सोडून दिलं होतं.

बँकॉकला आल्यापास्नं रात्रंदिवस नेताजींची बोलणी चालायची लष्करी चिटणीसांशी. नोटबुक न् पेन्सिल घेऊन मलापण हजार राह्यला लागायचं ह्या बैठकींना.

जगाचा इतिहास भयंकर झपाट्यानं बदलत चालला होता. जर्मनीने शरणागती स्वीकारल्याची बातमी दरम्यान येऊन गेली होती. जून महिन्याच्या नऊ तारखेला. नंतर चार दिवसांनी चर्चिलने म्हणे सबंध ब्रिटिश साम्राज्यात एकदिवसाची सुट्टी जाहीर केली होती. तेरा जून. प्रचंड उत्साहानं भारतात 'थँक्सगिविंग डे' साजरा झाला म्हणून 'ए-आय-आर' नं बातमी दिली. ए-आय-आर म्हंजे ऑल इंडिया रेडिओ. पण आम्ही म्हणायचो अँटि-इंडिया रेडिओ. हिटलरनं आत्महत्या केली. मुसोलिनी आधीच मेलेला.

ह्याचा सरळ अर्थ असा होता की इंग्लंड-अमेरिका आता आपली पुरी ताकद पूर्व-आशियाच्या रणांगणात लावणार होते. पश्चिम आघाडी थंडावली होती. तिथली शस्त्रसामग्री इकडे ह्या टोकाला यायली काय अवकाश लागेल तेवढाच. म्हंजे जास्तीतजास्त काही आठवडे.

रशियानं अजून उघडपणानं जपानविरुद्ध युद्धाची घोषणा केली नव्हती. एवढाच काय तो भरोसा. पण रशिया वगळूनदेखील लढाईच्या ह्या नव्या परिस्थितीत जपान एकटा इंग्लंड-अमेरिकेच्या संयुक्त सैन्याशी आणखी कितीकाळ मुकाबला करेल--करू शकेल--हा एक मोठाच प्रश्न होता. परिस्थिती आणखीनच बिकट झाल्यावर आझाद हिंद सेनेने काय करावं हा सर्वांत मोठ्ठा सवाल होता.

जपाननं किंवा नेताजींनी रशियाविरुद्ध लढाईची घोषणा केली नव्हती. अशा परिस्थितीत नेताजींनी जपान सरकारच्या मार्फत रशियन वकिलातीशी संधान बांधावंका काय ? जपाननं जर का शरणागती स्वीकारली, तर मग नेताजींनी रशियात जाऊन लपून राहणंच योग्य होईल का काय ? इंग्लंडच्या ह्या नंबर एकच्या शत्रूला रशिया आसरा देईल का ?--बहुतेकांचं मत होतं, नेताजींनी आताच ह्या दृष्टीनं प्रयत्न करावेत.

दरम्यान एकदा काही जरूरीच्या कामाकरता नेताजींना सेरामबागला जावं लागल. दोनच दिवसात ते परत यायचे. पण काही कारणानं ते बरेच दिवस सेरामबागला अडकून पडले.

हापण एक भलताच करुण प्रकार होता.

आझाद हिंद सेनेचा एक वरिष्ठ अधिकारी एका चिनी बाईच्या नादी लागला होता. ही बाई आणखी गुप्तहेर होती. काही गुप्त लष्करी माहिती ह्या

बाईच्या मार्फत शत्रूच्या हाती गेली होती. ती बाई अन् तो अधिकारी—दोघांच्याहिवर लष्करी खटला चालला. कोर्ट-मार्शलमधे न्यायाधीश म्हणून तिघंजण होते. मेजर-जनरल अलगप्पन, कर्नल नागर अन् कर्नल हबिबुर रहमान. नेताजी फार अस्वस्थ झाले होते. कारण जपान सरकार त्यांच्यावर दबाव आणत होतं जपान सरकारचं म्हणणं असं होतं, त्या चिनी बाईला आपल्या हाती सोपवा. त्यांचं म्हणणं तसं सरळच होतं. आझाद हिंद सेनेतल्या विश्वासघातकी अधिकाऱ्याचा न्यायनिवाडा आझाद हिंद सेनेनं खुशाल करावा. पण ही चिनी बाई काही भारतीय नाही. जपानच्या लष्करी मोहिमेत तिनं व्यत्यय आणलाय्. तेव्हा तिचा न्यायनिवाडा निप्पन सरकारच करेल.

त्यांचं म्हणणं हे असं—अगदी सरळच होतं. पण का कोणजाणे, नेताजींना काही केल्या हा स्वच्छ लष्करी युक्तिवाद मनापास्नं मान्य करणं जमत नव्हतं. त्याला काय कारण होतं हे मला ठाऊक आहे. हेरगिरी करणारी व्यक्ती जर बाई नसती, तर कदाचित् नेताजी एवढे बेचैन झाले नसते. कुणी पुरुष हेर असता तर त्याला जपान सरकारच्या हाती सोपवायला नेताजींनी हरकत घेतली नसती बहुतेक. पण आपल्या देशाची असो की परदेशाची असो, ती एक स्त्री आहे ही गोष्ट नेताजींना नजरेआड करता येत नव्हती. लढाईसारख्या भयंकर मामल्यात तिनं आपलं कितीही नुकसान केलं असलं तरी ती एक स्त्री आहे. आईच्या जातीची ! अन् नेताजींना भीती होती बहुतेक की एकदा का ती जपान्यांच्या तावडीत सापडली की मग तिला आपल्या जिवाखेरीज आणखीही काही गमवावं लागेल. त्यांची हरकत होती ती ह्यालाच ! त्यामुळे ते स्वतः धावत गेले होते सेरामबागच्या लष्करी न्यायालयात !

सेरामबागच्या ह्या दहा ऑगस्टपास्नंच शेवटच्या अंकाच्या शेवटच्या दृश्याचा पडदा वर गेला होता. असं धरता येईल. नेताजींचं प्लेन म्हणे क्रॅश झालं—सगळ्यांनाच ठाऊक आहे ते—अठरा ऑगस्टला. म्हंजे मग ह्या दहा तारखेपास्नं त्यांच्या धांदलीच्या आयुष्याचा शेवटचा आठवडा सुरू होतो. ह्या शेवटच्या आठवड्याची गोष्टच मी सांगणाराय् तुम्हाला.

१० ऑगस्ट १९४५ !

मध्यरात्रीची वेळ. नेताजी आपल्या काही सहकाऱ्यांनिशी सेरामबागच्या बंगल्यांत वरच्या मजल्यावरच्या एका खोलीत बसले होते. बोलायला सुरुवात झाली होती ह्या कोर्टमार्शलवरनंच. पण अकरा वाजून गेल्यावर बोलणं आपोआपच पुढं काय करायचं इकड वळलं. ह्या बैठकीला तिघं लष्करी न्यायाधीश होतेच. शिवाय अय्यरसाहेबपण होते. नेताजींचे विश्वासू अनुयायी अन् आझाद हिंद सरकारचे प्रचारसचिव. अय्यरसाहेब आधी रॉयटरचे बातमीदार होते. नंतर त्यांनी नेताजींच्या ह्या यज्ञात उडी घेतली होती.

खोलीच्यासमोरच एक प्रशस्त गच्ची

होती. भयंकर गरम होत होतं. गच्चीकडलं दार उघडंच होतं. समोरच्या लॉनवर संत्री पहारा देत होते. लांब रस्त्यावर काही दिवे मिणमिणत होते. टोपी घातलेले दिवे. अंधुक उजेड पसरवत होते बिचकत–बाचकत. ब्लॅकआउट चाललेला सगळीकडे. म्हणून सेरामबाममधेपण अंधार. काही निर्णय झाला की नेताजी लगेच म्हणत होते––भासी, लिहून घे.

ताबडतोब शॉर्टहँडमधे मी भराभरा नोट्स घेत होतो. उद्या सकाळी हे सगळं टाईप करून पेश करायला हवं. नेताजींच्या सहीकरता.

अचानक खोलीच्या पलीकडच्या टोकाला असलेला टेलिफोन खणखणायला लागला. मी जाऊन टेलिफोन उचलला. ट्रंक-लाइनचा ऑपरेटर म्हणाला––लाँग-डिस्टन्स कॉल आहे. कुआलालंपूरहून.

रिसीव्हर हातात धरून बाकीच्या मंडळींच्याकडे वळून मी म्हणालो–– कुआलालंपूरहून कुणीतरी फोन केलाय्.

नेताजी लगेच ताठ होऊन बसले.

मेजर अलगप्पन ढांगा टाकत फोनकडे आले.

––हॅलो! मेजर-जनरल अलगप्पन स्पीकिंग! कोण?...ओ! काय खबर! लढाईबद्दल महत्त्वाची बातमी?... काय?

लगेचच चमकून ते उद्गारले–– व्हॉट? ओ! अच्छा! नेताजींशी बोला!

नेताजी उठून आले, त्यांनी रिसीव्हर घेतला. काही मिनटं ते ऐकत राह्यले. मग रिसीव्हर परत ठेवून ते आपल्या खुर्चीवर जाऊन बसले. बाकीच्या मंडळींच्याकडे बघून म्हणाले––कुआलालंपूनहून कर्नल इनायत कियानींचा फोन होता. मेजर-जनरल कियानींनं त्याला मला कळवायला सांगितलं होतं ––रशियानं जपानच्या विरुद्ध युद्ध पुकारलंय्!

बातमी एकाच वाक्यात सांगितली गेली. पण त्याचे परिणाम किती दूरगामी होते हे सगळ्यांनाच कळून चुकलं होतं.

म्हंजे ह्याच्यानंतर आता नेताजींनी रशियात जाऊन आसरा घ्यायची काहीच शक्यता राह्यली नव्हती. ब्रह्मदेशातनं, इंडोचीनमधनं, मलायामधनं निघून जावं लागलं तरी दुसऱ्या कुठल्यातरी देशात पाय रोवून तिथनं देशाच्या स्वातंत्र्याकरता शेवटची लढाई चालू ठेवता येईल अशी नेताजींची कल्पना होती.

ह्या एकाच वाक्यानं त्यांची ती कल्पना बाद झाली होती. ह्या बातमीनंतर आता सबंध जगात नेताजींना उभं राहता येईल अशी एकपण जागा राह्यली नव्हती. किती लहान होऊन गेली होती ही प्रचंड पृथ्वी त्या दिवशी!

मग नेताजींनी आम्हाला विश्रांती घ्यायला सांगितलं. दिवसाचं शेवटचं अभिवादन करून आम्ही जेव्हा नेताजींचा निरोप घेतला तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते.

दुसरा दिवस: ११–८–१९४५.

पहाटे उठल्या उठल्या अय्यरजी

भेटले. म्हंजे ते माझ्याही आधी उठले होते. घाईघाईत कुठंतरी चालले होते. कुठं जाताय् म्हणून विचारणं अर्थातच योग्य नव्हतं. म्हणून मी म्हणालो—गुडमॉनिंग सर !

मला बघितल्यावर थबकले.

हसून म्हणाले—आय डाउट इट !

मी म्लान हसलो. त्यांचं म्हणणं खरंच होतं. काल रात्री शेवटी जी बातमी मिळाली होती, त्यानंतर आजची सकाळ 'चांगली' निघणं संशयास्पदच होतं.

पोर्टिकोखाली नेताजींची खास गाडी उभी होती.

मी अय्यरजींना विचारलं—नेताजी इतक्या सकाळी-सकाळीच कुठं बाहेर चाललेयत ?

अय्यरसाहेब म्हणाले—नाही. मलाच कुआलालंपूरला जायला सांगितलं त्यांनी. बातमी कितपत खरी आहे तपास करायला जातोय् मी. लंचला इथं येतोय् परत. तू सांगून ठेव त्यांना.

मी काय म्हणतोय् ह्याची वाट पहात काही ते थांबले नाहीत. त्यांची गाडी धूळ उडवून फर्रदिशी निघूनपण गेली.

त्यादिवशी दुपारी नेताजींनी दोघा ब्रह्मी मंत्र्यांना जेवायचं आमंत्रण दिल होतं. ह्या असल्या औपचारिक खाण्या-पिण्यात मला काहीच काम नसायचं. विशेषत: पाहुणेमंडळी बाहेरची असल्या-वर. बाहेरचं कुणी नसलं की आम्ही सगळे बरोबरचं जेवायला बसायचो. जपानी कुणी पाहुणा असला की मात्र आम्ही वेगळे जेवून घ्यायचो. एरवी मात्र एकदमच. ह्या बाबतीत नेताजींना काहीच पंक्तिभेद नव्हता. प्रत्यक्ष रणां-गणांवर कितीदातरी साध्या जवाना-सारखं रांगेत उकिडवं बसून जेवताना मी त्यांना बघितलं होतं. साधा सैनिक जे खायचा, तेच अन्न नेताजीपण खायचे. अन् आम्ही एकदम जेवायला बसलो नाही तरी नोटबुक घेऊन मला हजर राह्यला लागायचं बऱ्याचवेळा. कारण जेवता-जेवताच त्यांना एकदम आठ-वायचं काहीतरी जरूरीचं काम. तसं झालं की म्हणायचे—भासी, जस्ट नोट डाऊन !

सांगायचे दोनतीनच शब्द ! म्हंजे असं—इनायत अबाउट कुआलालंपूर मीटिंग, किंवा—थीवर्स अबाउट लछमी ! बस् ! एवढंच ! मग फुरसत मिळाली न् एवढे दोन-तीन शब्द त्यांना सांगितले की पुरतं डिक्टेशन देऊन टाकायचे तेवढ्याश्या आधारावर !

त्या दिवशी दोघा ब्रह्मी पाहुण्यांना घेऊन नेताजी जेवायला बसले होते. जेवण निम्मं अर्धं झालंही होतं. एवढ्यात मला दाराशी अय्यरसाहेब दिसले. नेताजींची न् त्यांची नजरानजर झाल्या-झाल्या सॅल्यूट ठोकून ते आत आले. खुर्ची ओढून टेबलाशी बसले. एक रिकामी प्लेट त्यांनी आपल्यासमोर घेतली. अय्यरसाहेबांनी मिळवलेली बातमी ऐकायला नेताजी किती उत्सुक होते ते मला ठाऊक होतं. खरंच रशियानं जपानच्याविरुद्ध युद्ध पुकारलंय् का ? पण उतावीळपणाचं काहीच लक्षण नेताजींच्या चेहऱ्यावर उमटलं नाही.

म्हणाले--अरे, अय्यरला सूप दे. सूपच तेवढं आज चांगलं झालंय्! उशीर झाला म्हणून बिचाऱ्याला सूप मिळालं नाही असं नको व्हायला!

एका देशाचं भवितव्य ठरायचंय् अय्यरसाहेबांनी मिळवलेल्या छोटयाशा बातमीवर. अन् अशावेळी नेताजींना काळजी—अय्यरसाहेबांना सूप मिळतंय् का नाही ह्याची!

परत सगळे मन लावून जेवायला लागले. नेताजी मधनंच काही विनोद करत होते--जेवायच्यावेळी चालतात तसलेच. सगळे हसत होते.

एवढ्यात फोन वाजायला लागला. टेलिफोनपास्नं सगळ्यात जवळ अय्यर साहेबच होते. त्यांनी उठून फोन घेतला. दोन-चार मिनटं ऐकून त्यांनी फोन ठेवला. एकदा नेताजींच्याकडे पाह्यलं. पाहुण्यांच्यासमोर बोलावं का काय असा पेच पडला त्यांना.

—कुणाचा होता फोन?

नेताजींनी मामुली प्रश्न फेकला.

--सिंगापूरहून मेजर जनरल कियानींचा!

--तुला मी सूप खाऊ घालतोय हे सिंगापुरात बसल्या-बसल्याच जमन भाईला कळलं का काय?

सगळेच हसले. अय्यरसाहेबांनी काहीच उत्तर दिलं नाही.

काही सेकंद गेले असतील. नेताजींनी परत विचारलं--काय म्हणत होता जमनभाई?

अय्यरसाहेब गंभीरपणानं म्हणाले-- मेजर जनरल कियानींची अशी विनंती आहे की सरसेनापतींनी शक्य तेवढ्या लौकर सिंगापूरला येऊन जावं.

--का? आणखी काही झालं का काय?

अजिबातच न चाचरता अय्यरसाहेब म्हणाले--

अर्थातच काहीतरी झालंय्. नाहीतर अशी तातडीची विनंती केली नसती त्यांनी. पण कारण काही सांगितलं नाही त्यांनी. टेलिफोनवर सांगण्याजोगं नसेल कदाचित्.

नेताजी दोघा ब्रह्मी पाहुण्यांच्याकडे वळून म्हणाले–काही उल्लेखनीय बातमी आहे का रेडिओवर? शॉर्ट-वेव रेडिओ-सेट काही आणलेला नाही बरोबर.

पाहुण्यांच्यापैकी एकजण चुळबुळ करत म्हणाला--नाही, रेडिओवर काही, ऐकलं नाही मी. पण बाजारात मात्र जोरदार अफवा आहे की रशियानं जपानच्या विरुद्ध युद्ध पुकारलंय् म्हणून!

लगेच अय्यरजी म्हणाले--अफवा नाही ती. खरी बातमी आहे. आजच्या 'मलाय सिंबूम' अंकात जोरदार बातमी छापलेली आहे. दोमई न्यूज एजन्सीची बातमी आहे, मांचुकुओ भागात रशियानं बरीच धडक मारलीय् म्हणून.

पुडिंग चमच्यात घेत असताना नेताजी म्हणाले--मग तेवढ्याकरता मला कशाला सिंगापुरला जायला पाहिजे? रशियानं जपानच्याविरुद्ध युद्ध पुकारलं म्हणून आपल्या परि-स्थितीत काय काय बदल होणाराय्? इथलं काम अर्धं सोडून मी सिंगापूरला

जाण्यात काहीच मतलब नाही.

जेवण संपलं होतं. दोघंही व्रह्मी पाहुणे हुशार होते. आपण इथं असल्यामुळं ह्याचं काही जरूरीचे बोलणं खोळंबतंय हे त्यांच्या लक्षत येऊन चुकलं होतं. जेवणानंतर कॉफी नको म्हणून त्यांनी सांगितलं. निरोपाची म्हणून सिगरेट शिलगावून त्यांनी लौकरच निरोप घेतला.

लगोलग अय्यरजींनी हिप पॉकेट-मधनं काही गॅली प्रुफं काढली. कुआलालं-पूरहून त्यांनी वर्तमानपत्राची गॅली-प्रुफं आणली होती बातमी अजून छापली गेलेली नव्हती.

नेताजींनी त्या प्रुफांवरनं एकदा जलद नजर फिरवली.

म्हणाले--रशियन लोक बरेच पुढं आलेय्‌तसं दिसतंय्‌ म्हंजे मग जपान काही जास्ती दिवस टिकाव धरू शक-णार नाही.

नेताजी सेरामबागला काही खूप दिवस राहण्याकरता म्हणून आलेच नव्हते. दोनेक दिवसातच परतावं असंच त्यांच्या मनात होतं. त्यांच्यामुळं येताना काही शॉर्टवेव रेडिओ बरोबर आणलेला नव्हता. चिनी गुप्तहेर बाईच्या प्रकरणा-पायी त्यांना सेरामबागला आणखी काही दिवस रहावं लागलं. मनात नसूनसुद्धा त्यादिवशी आमच्याजवळ एखादा रेडिओ असायला हवा होता. खरं म्हंजे मेजर जनरल जमन कियानी का म्हणून सर-सेनापतींना इतक्या तातडीनं सिंगापूरला परत यायला सांगतायत्‌, ते कळून गेलं असतं लगोलग. रेडिओवर बी. बी. सी. किंवा ए-आय-आर कोणतंही स्टेशन लावलं असतं तर सगळा प्रकार स्वच्छ झाला असता ताबडतोब. मिळालेली बातमी नेताजींच्या किती विरुद्ध जाणारी आहे हे लक्षात यायला त्या दक्ष सेनापतीला अजिबातच वेळ लागला नव्हता.

नेताजींनी मात्र ह्या बातमीला फार महत्त्व दिलंसं वाटलं नाही.

त्या दिवशी संध्याकाळी सेराम-बामच्या लष्करी छावणीत सुमारे दोन हजार सैनिकांच्यासमोर नेताजी बोलले. मरेपर्यंत लढतच राह्यचं ते उदात्त आवाहन. मान ताठ ठेवून वीराप्रमाणं प्रत्येक आघात सहन करायचा आदेश.

भाषणाहून परतायला दहा वाजले. रात्रीच्या जेवणानंतर आम्ही आपापल्या खोलीत जायच्या बेतात होतो. झोपून टाकावं आता. एवढ्यात परत फोन खणखणला.

वारंवार सारख्या वाईट बातम्याच तेवढ्या येतायत्‌. टेलिफोनचा आवाज म्हंजे अमंगळ वाटायला लागला! टेलिफोन घ्यायला कुणीच पुढं व्हायचं नाही!

मीच होतो सर्वांत जवळ! रिसीव्हर उचलला.

हापण लांबचा ट्रंक-कॉल. डॉक्टर लक्ष्मण यांचा. डॉक्टर म्हंजे इंडिया इंडिपेंडन्स लीगचे जनरल सेक्रेटरी. मलाक्काहून बोलत होते.

एका दमात म्हणाले—एक अत्यंत महत्त्वाची बातमी घेऊन मी न्‌ स्थानिक प्रचार-सचिव मिस्टर गणपती असे दोघं येतोय्‌ नेताजींना भेटायला.

मी म्हणालो—नेताजींना आत्ता बोलवू ? जागेच आहेत !

—नको ! बातमी फोनवर सांगता येण्याजोगी नाही ! त्यांना म्हणावं, आम्ही लगेचच निघतोय्. दोनपर्यंत पोचतोच तिथं !

आता मात्र नेताजी जरा काळजीत पडल्यासारखे झाले. रशियानं जपानच्या विरुद्ध युद्ध पुकारलंय् ही बातमी एव्हाना शिळी होऊन गेली होती. तेव्हा ही बातमी देण्याकरता काही ते धावतपळत खासच येत नव्हते. मग ?

आम्ही सगळे जागेच राह्यलो. बसून होतो वाट बघत. घड्याळाचा काटा आपली वाट चालत होता. निःस्तब्ध रात्र. सगळीकडे सामसूम. पूर्व आशियातली ही काही माणसं ज्यांच्याकरता रात्रीमागून रात्री अशा जागून काम करत होती, ते भारतीय लोक एव्हाना गाढ झोपी गेले होते. चर्चिलनं जाहीर केलेला ' थँक्सगिविंग डे ' सबंध भारतवर्षात साजरा झाल्याला महिना झाला होता.

ते वरच्या मजल्यावर बसले होते. मी खाली वरांड्यात. एका डेकचेअरवर.

इतक्यात पोर्टिकोत एक जिप येऊन थांबली. ज्यांची वाट पहात आम्ही रात्रीचे प्रहर मोजत होतो तेच दोघं. सर्वांगावर धुळीचा थर. केस सैरभैर. असे ते दोघं.

अंधारात मला बसलेला बघून विचारलं—ते जागे आहेत ?

—हो ! तुमचीच वाट पहातायत !

जलद पावलं उचलत ते जिना चढून गेले.

नंतरची घटना काही माझ्यासमोर घडली नाही. अय्यरसाहेबांच्याकडनं ऐकली मी.

नेताजी खोलीत बसले होते. अजुनी त्यांच्या अंगावर लष्करी पोशाखच होता. खाकी ब्रीचेस न् काळे टॉपबूट.

त्यांना बघून दोन खुर्च्यांच्याकडे बोट दाखवलं. दोघंही बसले.

—काय झालं ?

नेताजींनी प्रश्न केला.

डॉक्टर लक्ष्मणच्या उघड्या दाराकडे पाहतायत असं बघितल्यावर अय्यरजी उठले. त्यांनी दार बंद केलं. न् ते परत येऊन बसले.

खुर्ची किंचित् नेताजींच्याकडे ओढून घेऊन डॉक्टर लक्ष्मणच्या खालच्या आवाजात म्हणाले—सर, सांगायला फार वाईट वाटतंय्— जपान शरण गेलं !

हा क्षण अय्यरसाहेबांनी आपल्या चरित्रात अमर करून ठेवलाय्. त्यांच्या अनमोल पुस्तकाचा अक्षरशः अनुवाद म्हंजेच ह्या माहेंद्र मुहूर्ताची प्रत्यक्ष साक्षीदाराची जबानी!

" तात्काळ मी नेताजींच्याकडे नजर टाकली. हा घाव ते कसा काय सहन करतात हे मला पाह्यचं होतं.

" एक क्षणभर माझं स्वतःचंच डोकं चकरून गेलं होतं. माझ्या डोक्यात प्रचंड वेगानं नाना विचारांनी एकाचवेळी गर्दी करून टाकली होती. मी असा गांगरून गेलो होतो ते निव्वळ एकच क्षणभर

असं माझं मलाच वाटत नव्हतं. असंख्य शंकांनी मी अगदी हैराण होऊन गेलो होतो.

"माझ्या मनात विचारांचं काहूर उठलं होतं. आता मात्र खरोखरीच हा शेवटचा वज्राघात झाला तर! गेले चोवीस महिने हा माणूस तिळतिळ करत एक प्रासाद बांधत आला होता. अन् आता मात्र ऐकतो तो जमीनदोस्त होऊन जातोय्! हाच सगळ्यावरचा शेवटचा पडदा! सगळ्या स्वप्नांची समाधी! सगळ्या संग्रामांचा शेवट! आता ह्याच्यानंतर ह्या माणसानं जपून राहणं काय निरर्थक होऊन गेलं? हा घाव ते कसाकाय झेलतील! आता ह्याच्यानंतर तर क्षितीजापर्यंत पसरलेला निराशेचा अंतहीन अंधार! ह्या अंधाराच्या पैलतीरावरनं एखाद्या नव्या रणक्षेत्राची परिकल्पना करणं आज कल्पनेच्याही बाहेरचं आहे! तर मग आता हे पुरती हार कबूल करतील का? हे? आजन्म क्रांतीकारक नेताजी?

"मरणाच्या वेदनांनी माझ्या अंतरात्म्याला गुरासारखं ओरडावंसं वाटलं. माझं डोकं चकरून गेलं होतं. ही बातमी ऐकल्यानंतर अनंत काळ लोटलायसं वाटत होतं.

"अविचलित चित्तानं नेताजींनी बातमी ऐकून घेतली. फक्त एकदाच अस्फुटपणान 'हूं' म्हणाले.

"मग ते खोल विचारात बुडून गेले. एका क्षणाचे काही तुकडे! दुसऱ्याच क्षणी नेताजी नेहमीचे झाले. तेच मृत्युंजयी निर्भय नेताजी! फिकट स्मिताची अस्पष्ट रेषा त्यांच्या ओठांच्या टोकाला उमटल्यासारखी झाली. बातमी ऐकल्यानंतरचे पहिले शब्द होते—'अच्छा, म्हंजे असा प्रकार आहे! तर मग आता प्रश्न असा की ह्याच्यानंतर काय करता येईल!'

"म्हंजे आता सैनिक बोलतोय. एवढ्यातच ते पुढं काय करायचं, पुढची लढाई कुठं द्यायची वगैरे गोष्टींच्याबद्दल विचार करायला लागले होते. हार मानायला काही ते तयार नव्हते! जपानची शरणागति म्हंजे काही भारतीय मुक्तिसेनेची शरणागती नाही! जपाननं नमायचं कबूल केलं म्हंजे काही आझाद हिंद सेनेनं नमायचं कबूल केलं असं नाही. ते काही केल्या पुरती हार मानायला तयार नव्हते! सुभाष बोसच्या शब्दकोषात 'नमणं' म्हणून काही शब्द नव्हता! दुर्दैवाची पराकाष्ठा झाली तर त्याला त्यांचं उत्तर होतं—पुरती उपेक्षा! अचानकच ते थट्टामस्करी करायला लागले. लहान मुलासारखं ते हसत होते, गमतीदार बोलत होते."

महाभारतात मी एक गोष्ट वाचली होती. इंद्रानं म्हणे एकदा विष्णूच्या गरुडावर वज्र फेकलं. ह्या प्रचंड वज्राचा प्रहार झेलण्याची ताकद होती त्या पक्षांच्या अंगात (पण तसं केलं तर वज्राचा अपमान होईल म्हणून गरुडानं आपल्या अंगावरचं एक पीस गळूं दिलं होत. ते पीस जाळून टाकून वज्र इंद्राकडे परतलं होतं. डॉक्टर लक्ष्मणच्या ओठातनं बाहेर पडलेलं हे वज्रपण नेताजींच्या अंत:करणावर धडक घेऊन

निष्फळच ठरलं होतं. पण त्या वज्राचा अपमान व्हायला नको म्हणून आपल्या स्मिताच्या फिकटपणात नेताजींनी वज्राला संधी दिली होती स्वतःचा मान ठेवायची!

त्या दिवशी रात्री तिथं हजर असलेल्या मंडळीत बंगाली कुणीच नव्हतं. मेजर-जनरल चतर्जी, देवनाथ दास, किंवा राणीवाहिनीतल्या बेला दत्त, माया गांगुली, रेवा सेन, चित्रा मुखर्जी, नमिता सेनगुप्त—ह्यांच्यापैकी कुणी तेव्हा तिथं असतं तर नेताजींच्या त्या फिकट स्मिताच्या बदल्यात त्यांनी कवितेच्या काही ओळी म्हणून टाकल्या असत्या—

पडला घाव!
एवढंच? आणखी काही नाही?
मोडून गेली भीती.
जेव्हा उगारलेलं होतं तुझं शस्त्र—
तुला माझ्यापेक्षा मोठं मानून घेतलं होतं मी.
तुझ्या घावाबरोबरच खाली आलास तू.
जी माझी स्वतःची जमीन आहे तिथं.
तुच्छ होऊन गेलास तू आज.
माझी सगळी लाज पळून गेली.
कितीही मोठा असोस,
तू काही मृत्यूपेक्षा मोठा नाहीस!

'मी मृत्यूपेक्षा मोठा आहे'—असे शेवटचे शब्द बोलून निघून जाईन मी.

डॉक्टर लक्ष्मणय्या, गणपती, अय्यरजी अन् नेताजी ह्यांची मग एक बैठक बसली. ती बराच वेळ चालली होती. मी बाहेरच्या वरांड्यात एका वेताच्या खुर्चीवर बसून राह्यलो होतो. एव्हाना बातमी माझ्यापर्यंत येऊन पोचली होती. नाहीतर खुर्चीत बसल्या बसल्याच झोप लागून गेली असती. पण अशी भयंकर बातमी ऐकल्यावर कसली झोप येते! नेताजी भेटले तर बरं होईल असं सारखं वाटत होतं. अन् आत्ता ते मोकळे होतील असं स्वतःला समजावत मी खुर्चीत बसून होतो. तासामागनं तास चालले होते. पूर्वेकडच्या आकाशात पहाटेपूर्वीच्या काळोखात शुक्र आपल्या तेजानं झळकत होता. पण तो मावळायलापण आता फार अवकाश नव्हता.

शेवटी त्यांची बैठक सपली. ते खोलीतनं बाहेर पडले. तेव्हा पहाटेचे पाच वाजले होते.

नेताजी त्यांना दारापर्यंत पोचवायला आले.

—सकाळ झाली की निघू या आपण. म्हंजे संध्याकाळच्या आतच सिंगापूरला पोचता येईल.

अय्यरसाहेब म्हणाले—तर मग तुम्ही लौकर थोडी झोप पदरात पाडून घ्या, सर.

घड्याळ बघून नेताजी म्हणाले—हे काय लौकरच चाललोय् झोपायला! पाचच तर वाजलेत!

डॉक्टर लक्ष्मणय्या म्हणाले—नाही सर, थट्टा नाही, तुम्हाला काही विश्रांतीच मिळत नाहीय्.

ह्याच्यावरही थट्टेनं हसत-हसत ते म्हणाले—विश्रांतीची काय काळजी आहे आता लक्ष्मणय्या? उद्यापास्नं तर

अखंड विश्रांतीच आहे की !

बाकीची मंडळी निघून गेली.

मी दारातनंच संकोची आवाजात विचारलं—मीपण आता झोपायला जाऊ का सर ?

एव्हांना नेताजी खुर्चीवर बसून काळे टॉपबूट पायातनं ओढून काढत होते. आता हे बूट कशाला काढतायत कुणास ठाऊक. कारण आणखी तासाभरातच तर त्यांना बूट परत घालायला लागणारायत.

चांगले खुषीत दिसत होते नेताजी.

माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता म्हणाले —लढाईनंतर आता तू काय करणारायस भासी ? तुझी नोकरी तर संपली आज ! काय ?

मी गप्पच राह्यलो.

ते स्वत:ची बॅग भरत होते.

वर न बघताच परत म्हणाले—कायरे, काही बोलत नाहीस ते ! काय करणारायस लढाईनंतर.

—एक चरित्र लिहिणाराय् सर.

नाइट-ड्रेस हातात घेऊन ते बाथरूमकडे जात होते. मधेच थांबले.

म्हणाले-–असं ? कुणाचं चरित्र ? माझं ? व्हेरी इंटरेस्टिंग ! म्हणूनच रात्रदिवस नोट्स घेत असतोस वाटतं वहीत ? मग आजची सगळयात महत्त्वाची बातमी लिहून ठेवल्यायस का नाही तुझ्या नोटबुकमध्ये ! ऐकल्यायस ना आजची सगळ्यात चांगली बातमी ?

माझी मान खाली गेली.

—ऐकल्याय् सर !

—ठीक ! तर मग होऊन जाऊ दे तुझी परीक्षा ! बघू या तुला माझं चरित्र नीट लिहिता येईल का नाही ते ! सांग वरं, आजची ह्या क्षणीची सर्वात मोठी बातमी कोणती ते !

—जपान शरण आलं !

खो खो हसले नेताजी !

हसता हसताच म्हणाले—आय ॲम सॉरी बॉस्वेल ! ह्या बंगली सुभाष बोसाचं चरित्र लिहिणं काही तुला कधीच जमायचं नाही. तशी नजर नाही तुझ्याजवळ ! लिहून ठेव तुझ्या नोटबुकात—१९४५ सालच्या ११ ऑगस्टची स्टॉप-प्रेस हेडलाइन न्यूज अशी आहे : इटली नाही, जर्मनी नाही, एवढंच काय पण जपानही नाही—अख्ख्या जगात निव्वळ आझाद हिंद सरकारच तेवढं ब्रिटिश साम्राज्यवादाशी अजून लढत राह्यलंय् !

माझी मान परत खाली गेली.

मी परत मान वर केली, तर ते बाथरूममध्ये गेले होते.

नेताजी थट्टेनं बोलले होते. ती बातमी कळल्यापास्नं नेता जी सारखी थट्टामस्करीच करत होते. माझ्यावर मात्र भलताच कठोर आघात झाला. वाटलं, आज पहाटे आपल्या सरसेनापतींच्या उरलेल्या आयुष्याचं सगळं स्वप्नच तेवढं धुळीला मिळालं असं नाही, त्याबरोबर माझीपण स्वप्नं संपून गेली होती.

थट्टा नाही, बरोबरच म्हणाले होते ते. कठोर सत्य ! ह्या अद्‌भुत आशावादी माणसाचं चरित्र लिहायचा मला अधिकार नाही ! तशी नजरच लाभलेली नाही मला !

[ पुढील अंकी चालू ]

## क्रीडांगण

# ऑलिंपिक कुस्तीत नेमके काय घडले ?

मुकुंद मणूरकर

दर चार वर्षांनी भरणारा ऑलिंपिकचा सोहळा संपला. हॉकीतील एकुलते एक ब्राँझपदक घेऊन, रिक्तहस्ताने परतण्याचा ठपका न घेता, भारतीय पथक मायदेशी आले ! अर्थात् हॉकी आणि कुस्ती सोडल्यास इतर खेळात पदके मिळतील अशी कुणाची अपेक्षाही नव्हती आणि त्या खेळाडूंची तेवढी कुवतही नव्हती ! पैकी हॉकीत एक ब्राँझ पदक मिळाले. कुस्तीगिरांनी मात्र निराशा केली. कुस्तीगीरांचे पुण्यात भरलेले महिनाभराचे ऑलिंपिक पूर्व शिबीर मी पाहिले होते. त्यावेळी त्यांनी घेतलेली सक्त मेहनत व यशस्वी होण्याचा त्यांचा जबर आत्मविश्वास पाहून एकदोन मल्ल तरी पदके मिळवतील अशी अपेक्षा होती. पण ती फलद्रूप झाली नाही. सुदेशकुमार व प्रेमनाथ या दोघांनी आपापल्या गटात सहाव्या फेरीपर्यंत धडक मारून चौथे क्रमांक मिळविले व कुस्तीपथकाबद्दल बाळगलेल्या अपेक्षा अगदीच अनाठायी नव्हत्या हे सिद्ध केले एवढेच ! हे असे का झाले ? आपल्या गटातील विश्वविजेत्या मल्लावर मात करणारा सुदेश शेवटी पराभूत का झाला ? भरपूर उंचीचा व पोलादी मनगटाचा अनुभवी असा चंदगीराम पहिल्या दोन फेऱ्यातच का बारगळला ? किंवा आयत्यावेळी दौरा करण्याची संधी मिळालेल्या बिराजदारने अंगचोरपणाचा खेळ का केला ? या व अशाच इतर गोष्टींची कारणे जाणून घेण्याची इच्छा होती. त्या दृष्टीने या विषयावर अधिकारवाणीने बोलू शकेल अशी एकुलती एक व्यक्ती, म्हणजे म्युनिचला गेलेले भारतीय कुस्तीपथकाचे मार्गदर्शक श्री. बाळासाहेब लांडगे यांची भेट घेतली. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून पुढील मुलाखत तयार झाली आहे. कुठलाही अभिनिवेश न बाळगता अत्यंत अलिप्त दृष्टीकोनातून भारतीय कुस्तीतील गुणदोषांचे वर्णन लांडग्यांनी केले आहे.

: परदेशातील कुस्तीच्या तुलनेत आपल्याकडील कुस्तीत कोणत्या त्रुटी आढळतात ?

: पहिली गोष्ट म्हणजे सरावाचा अभाव. आपले मल्ल वर्षानुवर्ष मातीत कुस्ती करतात व स्पर्धेच्या आधी एक-दोन महिनेच गादीवरील कुस्तीचा सराव करतात. याच्या उलट, अमेरिकन मल्लाकडून स्पर्धेत उतरण्यापूर्वी तब्बल



म्युनिकला गेलेल्या कुस्तीपथकाचे मार्गदर्शक : बाळासाहेब लांडगे

अकरा वर्षे सराव करून घेतला जातो. हायस्कूलमध्ये असतानाच मुलाला हेरून त्याला शिक्षण दिले जाते. जपानमध्ये ह्याच शिक्षणाचा काल ७ वर्षांचा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या मल्लांना असणाऱ्या आर्थिक विवचना ! कुठेतरी कष्टाची कामे करून त्यांना आपल्या खुराकाची सोय करावी लागते.

: या बाबतीत परदेशी मल्ल सुदैवी आहेत ?

: हो नक्कीच. ऑलिंपिक स्पर्धेत चारवेळा सुवर्णपदक मिळविणाऱ्या अलेक्झांडर मेद्‌विद या रशियन मल्लाने मला सांगितले की त्याच्या खुराकाची व कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी सरकार उचलते. त्यामुळे एक स्पर्धा संपल्यावर लगेच दुसऱ्या स्पर्धेची तयारी तो निःसंकोचपणे करू शकतो !

तंत्राच्या बाबतीत आपल्यात व इतरांच्यात किती फरक आहे ?

आपण या बाबतीत पुष्कळच मागे आहोत. कुस्तीतील नवनवीन तंत्रे आत्मसात करण्यासाठी जपान-अमेरिकेत खास संशोधन चालते. ऑलिंपिक कुस्त्यांची ते फिल्म काढतात. याच्या सहाय्याने आपल्या मल्लांतील दोषांचे निदान, प्रतिपक्षातील मल्लांच्या डावपेचांचा अभ्यास केला जातो व त्यावर मात करतील असे प्रतिडाव तेथील मल्लांना शिकविले जातात. या ऑलिंपिकमध्ये मला अनेक आश्चर्यकारक डाव पहावयास मिळाले. आजच्या स्पर्धेत आज शिकविलेला नवीन डाव उद्या जुना ठरण्याची शक्यता असते !

: तुम्ही म्हणता अशा फिल्मस भारताने काढल्या का ?

: अहो फिल्म्सचं जाऊद्याच, पण साधे कॅमेरेही आमच्याकडे नव्हते. कशीतरी खटपट करून आम्ही काही छायाचित्रे काढली !

: अशा प्रतिकूल परिस्थितीत सुदेशकुमार व प्रेमनाथ यांनी थोडेफार यश

मिळविले त्यामागची कारणे कोणती ?

: हे दोघेही श्रेष्ठ मल्ल आहेत हे नक्कीच- पण त्याचबरोबर त्यांना मिळणाऱ्या सवलतींकडेही पाहिले पाहिजे. हे दोघे दिल्लीचे मल्ल. दिल्लीत बिर्लाशेठजींनी एक आखाडा बांधला आहे. ४०-५० विद्यार्थी तिथे सराव करतात. व त्यांना चारपाचशे रुपये महिना खुराकासाठी दिले जातात. गुरु हनुमानप्रसाद या तज्ज्ञ शिक्षकाला बिर्लांनीच तिथे मार्गदर्शनासाठी नेमले आहे. सुदेश व प्रेमनाथच्या यशात या गोष्टींचाही वाटा आहे.

: बिर्लांसारखे इतर कुणी उद्योगपती अशी मदत करतात का ?

: कुणीही करत नाही !

: चंदगीरामचे अपयश किंवा हरिश्चंद्र बिराजदारने केलेला अंगचोरपणा याबद्दल काही सांगू शकाल का ?

: हरिश्चंद्रने अंगचोरपणा केला हे मला मान्य नाही. हरिश्चंद्र काय किंवा चंदगीराम काय त्यांच्या अपयशाला कारणीभूत त्यांची मातीतली कुस्ती आहे. मातीतल्या कुस्तीमुळे चपळता येत नाही व शरीराला लवचिकताही प्राप्त होत नाही. शिवाय खड्याने आणि मदगतीने लढत देण्याची सवय लागते. गादीवरील कुस्तीचा सराव करूनही हे दोष नाहीसे होऊ शकत नाहीत. माझे असे मत आहे की गादीवरील कुस्तीसाठी निवडलेले खेळाडू पूर्वी कधीही मातीत खेळलेले नसावेत.

: सुदेशकुमार सहाव्या फेरीत पराभूत झाला तेव्हा दिला गेलेला निर्णय बरोबर नव्हता असे म्हणतात ते खरे आहे का ?

: मला तसे वाटते. पहिल्या राऊंडला रेफरीने चुकीचे गुण दिले त्यामुळे सुदेश नर्व्हस झाला. तसेच नंतर त्याला एक चुकीचा 'इशारा' देण्यात आला. याचा त्याच्यावर परिणाम झाला.

: मग या बाबतीत तुम्ही तक्रार केली का ?

: तक्रार करून काही उपयोग नव्हता. पण आंतरराष्ट्रीय कुस्ती महामंडळाचे अध्यक्ष सुरजितसिंग तिथे भांडले. अर्थात् त्याचा काही उपयोग झाला नाही.

: सुदेशकुमारच्या एकंदर दर्जाबद्दल आपले काय मत आहे ?

: ताकद, तंत्र, चपळता व दमदारपणा हे चार गुण ज्याच्यात असतील तो श्रेष्ठ ठरतो. सुदेशकुमारजवळ या चारही गोष्टी आहेत. माझ्या दृष्टीने त्यामुळेच तो सध्याच्या भारतीय संघातील सर्वोत्कृष्ट मल्ल ठरतो. म्यूनिचमध्ये त्याच्या कुस्तीवर सर्वजण खूष होते. एक अपवाद वगळता त्याने कुस्त्या चितपटीने व आकर्षक पद्धतीने जिंकल्या.

: प्रेमनाथ सहाव्या फेरीत जखमी झाला तो कसा काय ?

: तो कसा जखमी झाला ते कुणालाच समजले नाही. जपानी मल्लाला टांग मारून तो वर आला तेव्हा त्याच्या बरगड्या लोंबताना आम्हाला दिसल्या.

: यावेळी भारतीय डॉक्टर तिथे उपस्थित नव्हते ना ?

: नव्हते !

: या बाबतीत तुमची प्रतिक्रिया काय?

: या विषयावर मी काही न बोलणे उचित होय!

: या ऑलिंपिकमध्ये भारतीय पथकातील काही व्यक्तींनी गैरप्रकार केले त्याबद्दल काही—

: या विषयाची खूप चर्चा झाली आहे. आता तर पार्लमेंटमध्ये हा प्रश्न गेला आहे. तेव्हा याबाबतीत मी काही बोलणे योग्य ठरणार नाही.

: आपल्याशी संबंधित आहे म्हणून एक विचारतो. काही अनधिकृत व्यक्तींनी कुस्तीगीरांच्या निवासस्थानी प्रवेश केल्यामुळे काही मल्लांना जमीनीवर झोपावे लागले असा आरोप केला गेला, याबाबत काही खुलासा ?

: हा आरोप चुकीचा आहे. आमच्या खोलीत एकाही अनधिकृत व्यक्तीने प्रवेश केला नव्हता. दुसरे असे की, काही मल्लांना (उदा. चंदगीराम) पलंगावर झोपण्याची सवय नाही. त्यामुळे ते जमिनीवर झोपत.

: पुढील ऑलिंपिकमध्ये यश मिळविण्यासाठी आपण काही योजना आखल्यात काय ?


: होय. मी हायस्कूल आणि महाविद्यालयातील पहिल्या वर्षातील मुलांची निवड करणार आहे. आणि त्यांना सतत चार वर्षे गादीवरील कुस्तीचे शिक्षण देणार आहे. माझी मागणी एवढीच की या मुलांच्या खुराकाची व्यवस्था कोणीतरी करावी. मी काही महाविद्यालयातील शारीरीक शिक्षण प्रमुखांना माझी योजना समजावून सांगितली. आणि ती त्यांना पटली. आता दिवाळीनंतर पुण्यातील एखाद्या मध्यवर्ती महाविद्यालयात मी हे शिक्षणकेंद्र सुरू करणार आहे. □

## व्यावसायिक क्षेत्रात खोखोचे पुनरागमन !

राणाप्रताप संघ ही पुण्यातील देशी खेळांची अभिमानी संस्था यंदा रौप्यमहोत्सवात पदार्पण करीत आहे. त्यामुळे या संघातर्फे भरविण्यात येणाऱ्या कबड्डी-खोखोच्या स्पर्धा यंदा भव्य प्रमाणात होणार आहेत. दि. १८ पासून राज्य पातळीवरील कबड्डी स्पर्धेला आरंभ झाला असून दि. २५ पासून अखिल भारतीय पातळीवरील खोखो स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेच्या निमित्ताने एक चांगली गोष्ट घडत आहे, ती म्हणजे व्यावसायिक क्षेत्रात खोखोचे आगमन! कबड्डी व्यावसायिक क्षेत्रात पूर्णपणे रुजली आहे, खोखोचे तसे नाही. पूर्वी मुंबईचा खटाव मिल्सचा संघ खुल्या खोखो स्पर्धेत भाग घेत असे. पण आता ते भाग घेत नाहीत. या वेळच्या स्पर्धेत पुण्याच्या महाराष्ट्र बँकेचा संघ उतरत आहे, तो मात्र मोठ्या डौलाने! या संघात पाच राष्ट्रीय खेळाडूंचा समावेश असून त्यापैकी दोघांनी तर खोखोतील सर्वोच्च असे 'एकलव्य पारितोषिक' मिळविलेले आहे! त्यामुळे प्रथम पदार्पणातच महाराष्ट्र बँक ही स्पर्धा गाजवील असा विश्वास वाटतोय्!

# सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून सूर्योदयाच्या प्रथम किरणापर्यंत




सौ. पुष्पा भावे

‘अनिकेत’ या संस्थेतर्फे श्री. अमोल पालेकर यांनी श्री. सुरेंद्र वर्मा लिखित हिंदी नाटकाचा ‘सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून सूर्योदयाच्या प्रथम किरणापर्यंत’ हा मराठी अनुवाद सादर केला. या नाटकाचा कालखंड पौराणिक असला तरी त्यातील अनुभव व लेखक-दिग्दर्शकाची अनुभवाकडे जाण्याची पद्धती मनोविश्लेषणात्मक नाटकाची आहे. या नाटकात पौराणिकता महत्त्वाची आहे; कारण एखाद्या सामान्य व्यक्तीच्या जीवनातील संघर्षाच्या परिणामांचे वर्तुळ मर्यादित असते आणि म्हणून स्वतःच्या प्रश्नांची उत्तरे ती स्वतःच्या कलाने शोधू शकते; याउलट राजस्थानी असणाऱ्या पुरुषाच्या व्यक्तिगत प्रश्नांचे निर्णयही अनेकदा राजकारणाच्या कलाने घ्यावे लागतात. प्रस्तुत नाटकातील अनुभव स्त्री-पुरुष नात्यातील नाजुक प्रश्नांशी निगडीत आहे; आणि तरीसुद्धा हा विषय अंतःपुराचा उंबरठा ओलांडून राजप्रासादाच्याही बाहेर गेला आहे. मल्ल देशाचा राजा संपूर्ण पुरुष नसल्यामुळे राज्याला वारस मिळविण्यासाठी ‘नियोग’ मार्गाने पुत्रप्राप्ती करून घेण्याचा निर्णय त्याच्या राजमंडळाने घेतला आहे. या निर्णयाला राजाचा विरोध असूनही त्याच्यावर व राणी शीलवतीवर हा निर्णय राजकीय कारणासाठी लादण्यात आलेला आहे. राणी धर्मनटी बनून उपपतीची निवड करील, ही दवंडी म्हणजे आपल्या पौरुषाचा जाहीर अपमान आहे असे राजाला वाटते आहे आणि त्या सभारंभाच्या-उत्सवाच्या तयारीकडे पाहून तो चडफडतो आहे. तर असूर्यंपश्या असणारी राणी अनोळखी पुरुषाशी सर्वात निकट नाते कसे निर्माण होणार—हा व्यभिचार तर नाही? या शंकेने व्याकूळ झाली आहे. इथे महा-

राज व महाराणी राजा-राणी नाहीत; केवळ स्त्री-पुरुष आहेत. परंतु महामात्य, महाबलाधिकृत आणि राजपुरोहित यांच्या दृष्टीने हा प्रश्न फार सोपा आहे. धर्म व राजकारण यांची 'नियोगा' ला मान्यता असल्यामुळे संदेहाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. राजाला राज्याच्या सुरक्षिततेचे आणि राणीला मातृत्वाचे प्रलोभन दाखवून त्यांनी त्यांच्यापुरता हा प्रश्न सोडवला आहे

या एका निर्णयामुळे सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून, म्हणजे राणी धर्म-नटी बनून राजप्रांगणात उतरल्यापासून, सूर्योदयाच्या प्रथम किरणाबरोबर ती परत येईतो सर्वांची ताणलेली मनस्थिती हा या नाटकाचा मूळ अनुभव आहे. हे लक्षात घेऊनच अनुवादक व दिग्दर्शक श्री. पालेकर यांनी निळे-काळे पडदे, अंतःपुराच्या पायऱ्या व खांब यांनाही तसेच आच्छादन, आणि त्याच्याशी विरोध साधणाऱ्या दोन उंच समया व मद्यतबक, याव्यतिरिक्त रंगमंच रिकामा ठेवला आहे. प्रकाशयोजनाही मनोवृत्ती-दर्शक व ध्वनि संकलन आवाज घुमल्याचा आभास निर्माण करणारे असल्यामुळे संपूर्ण प्रयोगाचा 'मूड' फार चांगला राखला गेला. महत्तरिका (सौ. विद्या आपटे) आणि राजा (श्री. अच्युत पोतदार) यांच्या संवादातून एकाच वेळी पूर्वकथन, मनावरील ताण आणि नाटकातील अनुभवाला महत्तरिकेच्या अनुभवाचा छेद फार परिणामकारकतेने साधले आहे. परंतु एका नपुंसकाचे दुःख व्यक्त करणे, राजा आणि पती या दोन नात्यातील संघर्ष नेमका व्यक्त करणे श्री. पोतदार यांना झेपले नाही. संथ निवेदन व भावविवशता या दोन टोकांमधला सूर आपल्या संवादांना देणे त्यांना साधत नव्हते. त्यांचा आवाज व उच्चार कमकुवत होते. परंतु तो या संपूर्ण प्रयोगाचाच स्थायीभाव होता. विशेषतः सौ. पालेकर, श्री. पोतदार यांच्या मराठी उच्चारात अमराठीपणा विशेष जाणवत होता. जवळजवळ सर्वच पात्रे विलक्षण वेगाने बोलत होती. त्यामुळे अनेकदा शब्द प्रेक्षागृहात स्पष्ट पोचत नव्हते.

राणी शीलवती पहाटे राजप्रासादात परत येते ती स्त्रीत्वाचे सार्थक झाल्याच्या, शरीरसुखाच्या उन्मादात-पुत्रप्राप्ती हा हेतू तिला गौण वाटू लागतो. हे परिवर्तन नाट्यपूर्ण झाले असते, परंतु लेखनातच नाटक या भागात कच्चे राहिले आहे. ती परत आल्यावर रंगमंचाला वादसभेचे रूप येते ते हानि-कारक वाटते. याउलट तिचे पालटलेले, सुखाने मोहरलेले रूप पाहून राजाच्या मनात उठलेले वादळ आणि पति-पत्नी नात्यात निर्माण झालेला अंतराय यावर नाटककाराने लक्ष केंद्रिभूत केले असते तर नाटककाराला अभिप्रेत असणारा अनुभव अधिक गहिरा झाला असता.

नाटकातील वेशभूषा (सौ. लाजमी यांची) अत्यंत नेटकी, आटोपशीर, खोल रंगाचा वापर करून अनुभवाशी इमान राखणारी होती. शब्दोच्चार वजा करता नाट्यप्रयोग सादर करण्यात

विलक्षण सफाई होती. तरी नाटकाने पूर्ण समाधान दिले नाही कारण मुळात लेखन कच्चे होते. तरी श्री. अमोल पालेकरांच्या बंदिस्त दिग्दर्शनाचे, निश्चित रेषांच्या नेपथ्याचे कौतुकच करावयास हवे.

आपल्या नाटयप्रयोगासाठी स्वत:ला आवडलेल्या अन्य भषिक नाटयकृतींचे अनुवाद करण्याच्या त्यांच्या प्रथेमुळे मराठी रसिकांना इतर भाषेतील नाटय-कृतींचा परिचय होत आह हेही श्री. पालेकरांचे कार्य महत्त्वाचे आहे. ◻

# तरुण तुर्क म्हातारे अर्क

## नाटयमंदारचे नवे नाटक

सध्या मराठी रंगभूमीवर 'फार्स' ला लोकप्रियता लाभली आहे. गेल्या चार वर्षांत अगणित फार्स मराठी रंग-भूमीवर आले. करमणुकीसाठी शनिवार-रविवारी नाटकाकडे वळणाऱ्या प्रेक्ष-कांच्या अभिरुचीचा हा परिणाम असेल कदाचित. याचा अर्थ रंगभूमीच्या दृष्टीने फार्सला वा विनोदी नाटकाला महत्त्व नाही असे मला म्हणावयाचे नव्हते. परंतु चांगला फार्स वा चांगले विनोदी नाटक लिहिले जाणे आणि ते तोलामोलाने सादर करणे हे अत्यंत अवघड आहे. प्रेक्षागृहातून हशा व टाळया मिळविणे सोपे; परंतु संपूर्ण नाटकाची सुसंवादी आकृती जपणे फार अवघड असते. त्यातून बरेच फार्स परकीय कल्पने-वर आधारित असतात. आणि मग विशिष्ट सामाजिक वातावरणातून, संकेतातून निर्माण होणाऱ्या विनोदांचे रूपांतर करणे फार अवघड होते.

'तरुण तुर्क म्हातारे अर्क' या नाट-काची कल्पना सध्या मराठी रंगमंचावर चालू असलेल्या (मृत्युपत्र वा जागा यांच्यासाठी फसवाफसवी – त्यातून निर्माण होणारा गोंधळ) विनोदी नाटकांपेक्षा वेगळी–अधिक हृद्य आहे. एका महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये, बंडया टीवायकर आणि प्यारेलाल (आजीव सभासद) असे खास विद्यार्थी राहतात. तिथे एक म्हातारबुवा राहा-यला येतात आणि पुढे त्यातून ज्या अनेक गंमती निर्माण होतात त्यावर हे नाटक उभे आहे. 'High Time' सारखे परदेशी चित्रपट पाहिले असतील त्यांना कथानकाची कल्पना येईल. एका बाजूला पोरांचा त्यांच्या वयाला साजेसा टारगटपणा आणि दुसऱ्या बाजूला एक प्रौढ प्राध्यापिका आणि म्हातारबुवा यांचे नाजुक प्रकरण, असे या नाटकाचे दुहेरी कथानक आहे.

प्रा. मधुकर तोरडमल हे या नाट-काचे लेखक व दिग्दर्शक आहेत. विनोदी नाटकाच्या संदर्भात लेखक व दिग्दर्शक एक असणे याला काही विशेष अर्थ असतो. विनोदी नाटक दृश्य रूपात उभे करताना त्याची द्रुतगती, विनोदाचे तर्कशास्त्र, अभिनयात निर्माण केलेले विरोध या घटकांना फार महत्त्व असते. ते स्वत:च लेखकाने उभे केले की ते

स्वयंपूर्ण होण्याची शक्यता अधिक असते. या नाटकातील एक प्रमुख भूमिकाही श्री. मधुकर तोरडमल यांनी केली आहे. आतापर्यंत श्री. तोरडमल यांनी केलेल्या भूमिका (श्री. पु. भा. भाव्यांच्या एका नाटकातील म्हातारबुवा वजा करता) बऱ्याच एकसाची होत्या. या नाटकातील प्राध्यापकाची भूमिका फार वेगळी आहे आणि त्यांनी ती कार्यक्षमतेने उभी केली आहे. श्री. तोरडमल रंगमंचावर वावरताना आपले शरीर एरवी फार ताठ ठेवतात (हा त्यांना ज्या भूमिका मिळाल्या त्याचाही परिणाम असेल); परंतु मध्यमवयीन गबाळ्या प्राध्यापकाची या नाटकातील भूमिका वठवताना त्यांनी शरीर सैल सोडून अधिक वयाचा आभास निर्माण केला आहे, आपला आवाजही बदलण्याचा यत्न त्यांनी केला आहे.

श्री. दीनानाथ टाकळकर यांचा आवाज या नाटकातील रंगेल म्हाताऱ्याच्या भूमिकेला फारसा साजेसा नव्हता; परतु त्यांनीही खालच्या पट्टीत आवाज लावून, स्वतःचे अंग चोरून उतरत्या वयाचा समजूतदार म्हातारा उभा केला आहे. तरुण तुर्कातील मुख्य श्री. अविनाश मसुरेकर यांच्या चेहऱ्याला विनोदी भूमिकेचा लवचिकपणाच नाही. भुवया उडवतात, डोळे लहान-मोठे करतात, हात वापरतात परंतु संपूर्ण चेहऱ्याला Expression देणे काही त्यांना जमत नाही. श्री. मोहन मुंगी आणि श्री. सुधीर मुंगी यांनी कामे समरसून केली. कु. सीमा सावंत (ढमी) या विनोदी नाटकाला आवश्यक मुक्तपणे वावरू शकल्या नाहीत.

मुलांच्या खोलीतील एक पार्टनर बायकी असणे हा विनोदातला संकेत लेखकाने म्हाताऱ्याची तुर्कांवरील कुरघोडी दाखविण्यासाठी चाणाक्षपणे वापरला आहे. प्राध्यापकाची 'हा–ही–हे' वापरण्याची लकब विनोद निर्मितीला उपकारक ठरली आहे. परंतु पुढे पुढे अश्लील सूचनांसाठी त्याचा अतिरेक होतो. ढमीचे वडील बहिरे असणे, त्यांनी प्राध्यापकांच्या नावाची उलटापालट करणे ('रात्र थोडी सोंगं फार' – वकिलाच्या नावाची उलटापालट) इत्यादी भाग अनावश्यक लांबण लागल्यासारखा वाटतो. किंबहुना फार्सिकल विनोदी नाटकांच्या मानाने संपूर्ण नाटकाची लांबी फारच वाटते. नाटक विनोदी असल्याने, त्यातील कथाभागाची चर्चा करून, ज्यांना नाटक अजून पाहावयाचे आहे त्यांचा रसभंग मी करीत नाही. परंतु लेखकाने हे नाटक दिग्दर्शक या नात्याने संपादित करणे अत्यावश्यक होते. तसेच नाटकातील विनोदाचा अतिशयोक्त सूर आणि प्रौढ प्राध्यापिका व थत्तेकाका यांच्या नात्याचा नाजुक सूर या दोन सूत्रांच्या रचनेतून नाटककाराला एक उत्तम नाट्यकृती निर्माण करता आली असती. परंतु विनोद करून दाद मिळविण्याच्या भरात लेखक व दिग्दर्शक नाटकाच्या

[ पृष्ठ ५८ वर [

पडदा

ही आहे अगदी साधीशीच कहाणी

# सीक्रेट्स् ऑफ सान्ता व्हिट्टोरिया

देवीदास बागूल

ज्याच्या तोंडात तीळ भिजत नाही त्या माणसाजवळ काही खाजगी, गुप्त गोष्ट सांगण्यात काहीच अर्थ नसतो. अशा माणसांत बाईची गणना प्रथम करण्याची रीत आहे. बाईप्रमाणेच गावाच्या तोंडातही तीळ भिजत नाही. गावाच्या एका टोकाजवळ सांगितलेली बातमी दुसऱ्या टोकाला जायला वेळ असा लागतच नाही. गाव आणि गुप्तता ह्या दोन गोष्टी एकत्र नांदत नसतात असाच लौकिक आहे.

पण सान्ता व्हिट्टोरिया या गावाची गोष्ट तशी नव्हता. ह्या गावाच्या तोंडात तीळच काय, पण तिळाचा सबंध लाडू जरी ठेवला तरी तो भिजून लोणी झाल्याशिवाय तोंड उघडण्याची कल्पना-सुद्धा करू नका. खरं सांगायचं म्हणजे या गावाची प्रत्येकच गोष्ट वेगळी होती. हे गाव कोणत्या वेळी कस वागेल याचा कधीच अंदाज बांधता येत नसे. तुमच्या-आमच्यासारख्या गावाबाहेरच्या लोकांची तर बातच सोडा, पण खुद्द गावातल्या माणसालासुद्धा कोणत्या वेळी कोण कसं वागेल याचा भरवसा नसावा ! तसं नसतं तर त्या दिवशी तसं कशाला घडलं असतं ?

फॅबिया नावाचा गावातला तरुण बाहेरून बातमी घेऊन येतो, की मुसोलिनी गेला. खरं म्हणजे मुसोलिनीच्या हस्तकांच्या जाचाला कंटाळलेल्या गावकऱ्यांना ह्या बातमीने हर्षवायू व्हायला हवा होता. पण मघाच सांगितलं ना, की गाव बेभरवशाचं होतं म्हणून. बातमी दोनदोन, तीनतीन वेळा सांगूनही चौकात जमलेले गावकरी ढीम ! अंगावरचा केसही हालला नाही. कोण मुसोलिनी ? कुठला मुसोलिनी ? कसला मुसोलिनी ?

चित्रपटाच्या सुरुवातीला असा प्रसंग पाहून पुढच्या प्रसंगचित्रांची जात सम-

जते आणि जो तो सगळ गोष्टीचा नाद सोडून येईल त्या प्रसंगाला सामोरे जायला मोकळा होतो.

अशा चित्रपटात एखाद्या माणसाचे नाव बॉम्बोलिनी असणारच असणार ! आणि मुसोलिनीने जर असं म्हटलेलं असलं, की 'शंभर दिवस मेंढरू म्हणून जगण्यापेक्षा एक दिवस सिंह म्हणून जगणं चांगलं' तर बॉम्बोलिनी काय म्हणणार ते उघडच आहे. तो मुसोलिनीचं भींतीवरचं ते वाक्य पुसून It is better to live 100 days-Bombolini असं वाक्य झळकवतो.

अशा माणसाला मेयर करण्याची बुद्धी फक्त सान्ता व्हिट्टोरिया ह्या गावालाच होणार ! मघाच म्हटलं ना, की सान्ता व्हिट्टोरियाचं गूढ उकलण्याच्या फंदात पडू नका म्हणून ! वेळ पडली तर हे गाव तुमच्याआमच्या ध्यानीमनी नसलेलं धैर्य दाखवायलासुद्धा कमी करणार नाही. म्हणजे जरी त्या गावच्या मेयरने 'सिंहासारखं एक दिवस जगण्यापेक्षा १०० दिवस जगण्याचा' संदेश दिला असला तरी तोच मेयर एके दिवशी दहा लक्ष दारूच्या बाटल्या जर्मनांच्या धाडीपासून लपवून ठेवण्यासाठी पद्धतशीर योजना आखतो. तडफेने आणि चिकाटीने पार पाडतो आणि स्वत:सकट सगळ्या गावकऱ्यांच्या तोंडाला कुलपं ठोकतो.

आता गाव इतर बाबतीत कसंही असो, पण दहा लक्ष बाटल्यांची वाहतूक करण्याच्या वेळचे गाव पाहावे आणि त्याची दृष्ट काढावी ! गावातल्या गुदामापासून टेकडीवरच्या गुहेपर्यंत चार-चार रांगा ! बायाबापड्या, म्हातारेकोतारे सर्वजण हाताला हात लावून बाटल्या पसार करताहेत. दिवसरात्र. उन्हापावसात. ते दृश्य पाहून बालवीर संघटनेने धडे घ्यावेत. मधूनच मेयर येतो आणि दमल्याभागल्या आजीबाईंच्या बदली स्वत: उभा राहतो. अशा बॉम्बोलिनीला कोण मुसोलिनी म्हणणार नाही, सांगा ?

ज्या गावच्या मेयरच्या बोलण्याचालण्यात मेळ नाही त्या गावचे रहस्य किती हृद्य असते ते ह्या सामुदायिक कार्याच्या वेळीच बघायला हवे.

एका शब्दात या गावाचे रहस्य सांगायचे म्हणजे त्यातील प्रत्येक माणूस हा 'गाव' म्हणून जगतो, जगायला तत्पर असतो.

मग कोणते का अरिष्ट येईना !

होय, अगदी शील विकायची वेळ आली तरी शील विकतील, पण गाव अभेद्य ठेवतील.

म्हणून तर जर्मन अधिकारी गावातल्या श्रीमंत बाईला बोलावणे धाडतो तेव्हा ती बाई सरळ जाऊन येते. घरी परत आल्यावर प्रियकराच्या वक्षावर डोके टेकून स्फुंदून स्फुंदून रडताना ती निर्मळ झाली नाही असे कसे म्हणता येईल ?

वरून शेंदाड वाटणाऱ्या ह्या गावाच्या नाना कळा पाहताना कधी हसू येते, तर कधी पाचावर धारण बसते.

जर्मन अधिकारी त्या दहा लक्ष बाटल्यांसाठी गावाचा कानाकोपरा

शोधतात, दोन माणसांचा अमानूष छळ करतात आणि शेवटी जाता जाता मेयरच्या डोक्याला पिस्तुल टेकवून गावाला धमकी देतात, की 'बाटल्या कोठे आहेत ते सांगा, नाहीतर याचे डोके उडवतो.'

पण गाव ढिम्म! तोंडाला कुलपं! जणू काही मेयर आपल्या गावचाच नाही. क्षणभर त्या पाषाणहृदयी जर्मन अधिकाऱ्यालासुद्धा वाटतं, की ह्या गावाचं हृदय दगडाबिगडाचं तर नाही ना? दारूपायी हे गाव मेयर वाया घालवायला तयार आहेत?

गावाचं गूढ अनाकलनीय वाटतं हेच खरं!

आणि जर्मन अधिकारी विफल होऊन निघून जातो. त्याची पाठ वळल्या-बरोबर दगडी शिळासारखं उभं असलेलं गाव कारंजासारखं शतधारांनी उसळ्या मारीत थुईथुई नाचू लागतं.

ते हसणारं, नाचणारं गाव पाहून कोणाला वाटेल, की हे गाव कसं मन-मोकळं आहे, निर्व्याज आहे, प्रसादमय आहे! डोळे भरून बघावं असं हे गाव!

ह्या गावात न समजण्यासारखं काय आहे? □ □ □

---

## मध्यंतर : पृष्ठ ५५ वरून

परिणामाचा विचार करायला विसरले आहेत. दिग्दर्शकाने समूहाच्या विरचनेचा व हालचालींच्या गतीचाही फार विचार केलेला जाणवला नाही. अर्थात संपूर्ण प्रेक्षागृह हसत होते. हे नाटकाच्या यशाचे गमक असेल तर प्रा. तोरडमल यशस्वी झाले आहेत! □ □ □


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

प्रसिद्ध झाले

**एका पराभवाची कहाणी**

लेखक :

ब्रिगेडियर जे. पी. दलवी

अनुवाद :

अनंत भावे

## कलकत्ता मेल

पृष्ठ १० वरून

ळून येईल. त्याचा परिणाम म्हणून अशा एखाद्या संयुक्त नावाची गरज निर्माण होईल. अर्थातच कलदिया हे नाव भरभराटीस येऊ शकेल. पण आश्चर्याची गोष्ट अशी की हा मित्र असं गृहीतच धरून चालतोय की कलकत्त्याचे नेहमीच वर्चस्व राहणार आहे, आणि म्हणून त्याची कल्पनाशक्ती कलकत्त्यापासून सुरू होऊन हलदियाकडे प्रवास करू लागते. वास्तविक पाहता वस्तुस्थिती अगदी याउलट आहे. कलकत्ता आता पूर्वीचं राहिलेलं नाही. इतर सर्व शहरांनी त्यावर आघाडी मारली आहे. कारण हे शहर झपाट्याने विनाशाकडे झेपावत आहे. त्याचं वैशिष्ट्य इतिहासजमा झालं आहे. छोटीशी मिणमिणती आशा म्हणजे पुनरुत्थान. राष्ट्रीय पातळीवर होणारी हेळसांड हीच तर ह्या शहराचं वैभव झिजवून टाकण्यास नि त्याचं रक्त शोषण होण्यास कारणीभूत ठरली आहे. आणि ह्याच वेगाने शहर खालावत राहिलं तर एक दिवस त्याचा संपूर्ण विनाश होईल, ह्यात काहीच आश्चर्य नाही. अशा स्थितीत मग हलदियाला वन-वे ट्राफिक सुरू होईल. भारताच्या नव्या नकाशात हलदिया हे नाव मोठ्या अक्षरात झळकताना आढळेल. मग नवा मार्ग हलदियाकडून कलकत्त्याकडे असा उलटा होईल आणि त्यासाठी एक नवं संयुक्त नाव योजण्यात येईल. आमचा मित्र म्हणतो ते नाव कदाचित 'हलकत्ता' असंच असेल ! ◻

## शिक्षणपद्धति बदलायची आहे ? ह्या विद्यार्थ्यांना विचारा

आजची शिक्षणपद्धती अत्यंत खालावलेल्या अवस्थेला पोचली आहे हे निर्विवाद आहे. आता तिच्याकडे दुर्लक्ष करून उपयोगी नाही. इलाज राष्ट्रीय पातळीवर होणेच अत्यावश्यक आहे. प्रचलित शिक्षणपद्धती बदलली पाहिजे का ? ह्या प्रश्नावर काही विद्यार्थ्यांची मतं विचारण्यात आली. त्यांचं म्हणणं काय आहे ते आपण ऐकू या—

...एक विद्यार्थी पोलिटिकल सायन्स ह्या विषयात ऑनर्स करीत आहे. तो म्हणतो—

प्रचलित परीक्षा पद्धतीत बदल करण्यात यावा असं मला मनापासून वाटतं. कारण विद्यार्थ्यांच्या गरजा अपूर्ण राहतात. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचं मोजमाप करण्याचं परीक्षा हे खरं साधन नव्हे. त्यामुळे आमची घोकमपट्टीच फक्त अजमावता येणे शक्य आहे, परंतु आमची विचारशक्ती वाढवण्याचं सामर्थ्य त्यात अजिबात नाही. आमची परीक्षा ही आमच्या स्मरणशक्तिची परीक्षा असते, आमच्या ग्रहणशक्तीची नव्हे. शिक्षकांनी देखील एखाद्या विषयाचे बाबतीत विद्यार्थ्यांचे पूर्ण समाधान करणे आवश्यक असते.

दुसरी गोष्ट म्हणजे संधी आणि दैव

## पार्क-डेव्हीसचा

# त्रिविध फायदे देणारा

# निको साबण

## इतर कोणत्याहि साबणापेक्षा तुमच्या त्वचेची अधिक काळजी घेतो

**१** निको जंतूंचा नाश करतो
**२** निको शरीराचा घामटपणा घालवितो
**3** निको कातडी निर्मळ करून तिचे रक्षण करतो

निकोनें केलेले स्नान म्हणजे आरोग्यमान, नितळ कांतिकरिता घेतलेली परमावधीची काळजी! निकोच्या जंतुनाशक फेसामुळे कातडीवरील जंतूंचा नाश होतो आणि तिचे आरोग्य राखले जाते निकोच्या औषधी गुणधर्मामुळें शरीराचा घामटपणा व दुर्गंधी दूर होतात. निकोच्या प्रभावी जंतुनाशक क्रियेमुळे कातडीच्या साधारण रोगांपासून रक्षण होते व त्वचा निर्मळ धुतली जाऊन ती तजेलदार, कांतिमान व टवटवीत होते. निको पुटकुळ्या व घामोळें यापासूनही रक्षण करतो। निकोच्या नियमित वापराने डोक्यांतील खवड्यापासून बचाव होतो तुमच्या कातडीचा तजेलदारपणा व आरोग्य राखण्यासाठीं त्रिविध फायदे देणाऱ्या निकोचा वापर आजच सुरू करा.

TRIPLE ACTION

**NEKO®**

The Original Antiseptic Soap




निकोची संवय लावून घ्या
आपल्या त्वचेसाठीं तो आवश्यक आहे

® Regd. Trade Mark, Regd. Users—Parke Davis (India) Ltd., Bombay-72 AS

यांचाही परीक्षांचे बाबतीत फार मोठा वाटा असतो. अनेक वेळा ऐन परीक्षेत गडबड गोंधळ माजल्यामुळे विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव आपली जागा सोडून बाहेर जावे लागते. पुन्हा परिक्षा घेतली जातेच असे नाही. प्रांजळ विद्यार्थ्यांचे अक्षरशः नुकसान होते. ह्याऐवजी वेळो-वेळी तोंडी परीक्षा व मासिक परीक्षा घेऊन त्यावरून विद्यार्थ्यांची योग्यता ठरवणे अधिक श्रेयस्कर आहे असे मला वाटते. ज्ञानार्जनाचे काम अधिक सुकर होऊ शकेल.

...ही एक विद्यार्थिनी जाधवपूर युनिव्हर्सिटीत इंटरनॅशनल रिलेशन्स ह्या विषयात एम्. ए. करीत आहे. ती म्हणते—

आजची शिक्षणपद्धति आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्यास असमर्थ ठरली, इतकंच नव्हे तर तिचे दुष्परिणामच अधिक दिसू लागले आहेत, हे एक उघड सत्य आहे. माझ्या मते फक्त परीक्षा पद्धतीतच बदल करून उपयोग नाही. संपूर्ण शिक्षणच बदलायला हवे.

मुख्य गोष्ट अशी की परीक्षेच्या बाबतीत आपल्याकडे बरेचसे गैरसमज आहेत. सर्वसाधारण लोकांचं म्हणणं असं आहे की परीक्षा पद्धतीत बदल केला की शिक्षण आपोआप सुधारेल. परंतु हा समज चुकीचा आहे. उलट शिक्षणपद्धती संपूर्ण बदलल्याखेरीच परीक्षापद्धतीत बदल घडून येणंच शक्य नाही.

आपल्याला असं वाटत असेल की पुढारलेल्या देशामध्ये शिक्षण यशस्वी झालेले आहे कारण त्यांची परीक्षापद्धती निराळी आहे, तर ती एक मोठी चूक आहे. त्यांच्याकडे शिक्षण यशस्वी होण्याचं कारण म्हणजे राष्ट्रीय गर-जांच्या पूर्तिसाठीच तेथे शिक्षण देण्यात येते. आपला देश अजून अप्रगत आहे, आणि आपल्याकडील शिक्षण आणि देशाची गरज यांचा अन्योन्यसंबंध क्वचितच दिसून येतो ही दुर्दैवाची गोष्ट होय. ज्या शिक्षणपद्धतीमध्ये माण-साच्या आवश्यक गरजा भागविण्याचे सामर्थ्य नाही ते कसले शिक्षण? आपली आर्थिक पातळी अगदी सामान्य दर्जाची असल्याकारणाने कित्येक कुटुंबि-यांना शिक्षण म्हणजे एक अत्यंत खर्चाची बाब होऊन बसलीय्. म्हणूनच परीक्षांचं हे फसव चित्र अत्यंत हृदयविदारक आहे.

मला वाटतं आजच्या परिस्थितीत शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल इतक्या तातडीने घडवून आणावा की जेणेकरून देशाच्या उन्नतीला हातभार लागू शकेल. मग परीक्षा पद्धती आपोआपच सुधारेल, आणि आपली खरोखरच प्रगति होत असल्याचं संपूर्ण समाधान आम्हाला मिळू शकेल.

.. हा एक आर्ट कॉलेजचा विद्यार्थी-याने दोनतीन वर्षांपूर्वी डिप्लोमा घेतला आहे. तो म्हणतो—

परीक्षामध्ये खरं म्हणजे काळाचा अपव्यय फार मोठ्या प्रमाणावर होतो परीक्षेच्या भीतीने कितीतरी विद्यार्थी खेळ, छंद आदि गोष्टीकडे दुर्लक्ष कर-तात आम्हाला तर ह्या 'एक्स्ट्रा कॅरि-क्युलर' गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या

आहेत म्हणून सांगण्या येतं. कित्येक मुलं प्रकृतीकडे दुर्लक्ष करून रात्रंदिवस अभ्यास करीत सुटतात. झोप येऊ नये म्हणुन सारखे चहा कॉफी पितात. त्यांच्या मेंदूवर खूप ताण पडतो. आणि हा एवढा त्याग करायचा, प्रकृतीची हेळसांड करायची, कशासाठी? काही थोडयाशा अभ्यासक्रमाची घोकंपट्टी करण्यासाठी? ज्यांचा परीक्षेनंतर काहीही उपयोग नसतो अशा?

आणखी एक विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे निव्वळ पालक व शिक्षक यांना खूष ठेवण्यासाठी वाईट मार्गाचा अवलंब करून परीक्षा द्यायच्या नि पास व्हायचं—हा मोह कित्येक विद्यार्थी टाळू शकत नाहीत. त्यांचं पाहून इतरांनाही अनुकरण करण्याची इच्छा होतेच!

...हा एक विद्यार्थी इकॉनॉमिक्स ऑनर्स करणारा...ह्याचं म्हणणं असं—

सध्याची शिक्षणपद्धती सदोष आहे हे इतरांप्रमाणे मलादेखील वाटतंच! शिक्षणक्षेत्रात शिक्षणाची पातळी वाढण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न झालेच नाहीत; उलट ती खालीच घसरली आहे असंच म्हणावं लागेल. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आम्हाला नेमलेला अभ्यासक्रम अत्यंत जुनाट आहे हे गेली वीस वर्षं 'ज्युलियस सीझर'चाच अभ्यास विद्यार्थी करीत आलेले आहेत, यावरून स्पष्ट दिसतं. नव्या आणि प्रचलित साहित्याचा समावेश आमच्या अभ्यासक्रमात का होऊ नये? इकॉनॉमिक्ससारख्या विषयात ते सहज जमण्यासारखे आहे. कित्येक शैक्षणिक संस्थांमध्ये उत्कृष्ट शिक्षकांच्याअभावी शिक्षणाची पातळी फारच घसरलेली दिसते. त्याचं कारण म्हणजे शिक्षकांना मिळणारा तुटपुंजा पगार. साहजिकच जास्त पगाराच्या अवांतर नोकऱ्यांकडे ते आकृष्ट होतात.

कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या अधिकारात सुमारे दोनशे कॉलेजांचा समावेश आहे. युनिव्हर्सिटीचे दोन विभाग असावेत. एका विभागाने शिक्षणाची व्यवस्था बघावी आणि दुसऱ्या विभागावर नोकरी शोधून देण्याची जबाबदारी सोपवण्यात यावी.

जर आजचे विद्यार्थी उद्याच्या भारताचे आधारस्तंभ म्हटले जात असतील तर ह्या महत्त्वांच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

...हा एक शाळकरी विद्यार्थी. मॅट्रिकच्या वर्गात शिकणारा. ह्याच्या मते—

परीक्षा म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे ज्ञान अजमावण्याचे एक साधन होय. विद्यार्थ्यांना वर्षाच्या सुरुवातीला अभ्यासात विशेष रस वाटत नाही. कारण पहिली परीक्षा चार-पाच महिन्यांनी घेतली जाते. मग ते थोडंसं अगोदर अभ्यासाला लागून परीक्षा निभावून नेतात. काहीतर एका महिन्यातच अभ्यास करून चांगल्या तऱ्हेने पास होतात. म्हणजे सध्याच्या पद्धतीनुसार विद्यार्थ्याने वर्षभर अभ्यास केलाच पाहिजे असं नाही. पण हे काही ठीक नाही.

दुसरा मुद्दा म्हणजे एकापाठोपाठ एक विषय परीक्षेसाठी ठेवण्यात येतात. हे मला मुळीच आवडत नाही. आज फिजिक्सचा पेपर झाला की परवा लागलीच केमिस्ट्रिचा पेपर असतो. पहिला पेपर देऊन येताच विद्यार्थ्याला तो विषय एकदम हातावेगळा करावा लागतो. एवढच नव्हे, तेवढ्यापुरते इतर विषयही विसरावे लागतात. कारण दुसऱ्याविषयाची परीक्षा येऊन धडकलेली असते. हा आपल्या प्रचलित शिक्षण-पद्धतीमधील दोष आहे असे मला वाटते. याशिवाय कॉपी करणे हा सर्रास उपयोगात आणला जाणारा प्रयोग आहेच.

म्हणूनच शिक्षणपद्धती बदलायलाच हवी. प्रथम आठवडा व मासिक परी-क्षांचा अवलंब करणे इष्ट आहे. अभ्या-सात त्यामुळे एक नियमीतपणा येतो. तसेच एकाच विषयाचे सहासहा प्रश्न विचारण्याऐवजी सहा विषयांचे प्रत्येकी एकेक प्रश्न विचारणं अधिक श्रेयस्कर. त्यामुळे सर्व विषय आजच्यासारखे एकमेकापासून तोडून टाकले जाणार नाहीत. त्यांचे वर्गीकरणही होणार नाही व आम्ही विद्यार्थीदेखील परीक्षा आटोपताच सारे काही विसरून जातो तसे विसरणार नाही.

...हे आजच्या तरुणांचे, उद्याच्या नागरिकांचे मुक्त विचार...त्यांनी मांडलेले प्रश्न आणि त्यावर सुचविलेले उपाय...आतातरी ह्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा त्यांच्याच दृष्टिकोनातून विचार करून काही नव्या मार्गांचा अवलंब करण्याची वेळ येऊन ठेपली आहे ह्याची आपल्याला प्रकर्षाने जाणीव व्हायला हवी. □


माणूस दिवाळी अंकाचे मानकरी

ब. मो. पुरंदरे
दि. बा. मोकाशी
रवींद्र पिंगे
अशोक शहाणे
प्रभाकर पेंढारकर
चंद्रशेखर मराठे
शरद काळे
आणि
भाऊ पाध्ये

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणली एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का !

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/440



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649

आला फुलून साज शिणगार

अहो नवतिची नार
केले सोळा शिणगार
झुरे चित्त अनिवार
वाट पाहून विजली वात
गेली टळून मध्यान् रात

# गेली टळून मध्यान् रात !

माणूस

दिवाळी अंक

पेशवाईतील एका तरुण, रंगेल प्रतिभावंताच्या लावण्यवतीची कथा

ब. मो. पुरंदरे